
काबरा एक्सप्रेस
डेली AC बस / अर्जंट पार्सल सर्विस • फुल लोड / पार्ट लोड सर्विस उपलब्ध
गुजरात — अहमदाबाद, सुरत, अंकलेश्वर, राजकोट, बडौदा, किम, आनंद,नवसारी, वलसाड, वापी, भरुच, जामनगर
मध्यप्रदेश — इंदौर, (राज महौल्ला, तीन इमली) उज्जैन
महाराष्ट्र — मुंबई, (वसई, बोरीवली, अंधेरी, भिवंडी, वाशी) औरंगाबाद, नाशिक, पुणे
राजस्थान — उदयपुर, अजमेर, जयपुर | दिल्ली — मोरी गेट
साऊथ — बंगलोर, हैदराबाद, गोवा
अहमदनगर — नेवासकर पेट्रोल पंपासमोर, मार्केटयार्ड चौक, स्टेशन रोड ☏ 7972872112





संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, मंगळवार दि. ३१.१२.२०२४ | अंक नं. २५४ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020



गोड गोड हुरडा गरम गरम वनभोजन सहकुटुंब मित्रपरिवारासह निसर्गाचा मनमुराद आनंद घेऊया
२५ पेक्षाही अधिक मनोरंजनाची साधने व इतर बरेच काही
संपूर्ण परिवारासह साईबनमध्ये हुरडा पार्टी
आकर्षक पॅकेज उपलब्ध आजच संपर्क करा
वेळ : सकाळी ९ ते सायं ५
डॉ. कांकरियांचे साईबन
साईबन कृषी पर्यटन केंद्र, एम.आय.डी.सी. मागे, अहमदनगर
हेल्पलाईन - 9112288622
9850500905 / 9096639368



प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090


# मेडिकल दुकानातून चोरी; रोकड लंपास, दोन चोरटे सिसिटिव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद

## भिंगार परिसरातील घटना; फिर्याद नोंदवून घेण्यास पोलिसांकडून टाळाटाळ

नगर - भिंगार जवळील वडारवाडी येथे नगर - पाथर्डी रोडलगत असलेले मेडिकल दुकान अज्ञात चोरट्यांनी फोडून दुकानातील ड्रॉवरमध्ये कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी ठेवलेली २८ हजारांची रोकड चोरून नेल्याची घटना सोमवारी (दि.३०) सकाळी उघडकीस आली आहे. चोरीची ही घटना सीसीटीव्हीत कैद झाली असून, २ चोरट्यांनी ही चोरी केल्याचे सीसीटीव्ही फुटेज मध्ये दिसत आहे.



सिटी पॉईंट मेडिकलच्या शटरचे कुलूप तोडून चोरट्यांनी ड्रॉव्हरमधील रोकड चोरल्याचे दिसत आहे.

वडारवाडी परिसरात सह्याद्री हॉस्पिटलजवळ वसीम खान यांच्या मालकीचे सिटी पॉईंट नावाचे मेडिकल दुकान आहे. रविवारी (दि.२९) रात्री नेहमीप्रमाणे त्यांनी व कामगारांनी दुकान बंद करून ते घरी गेले. सोमवारी सकाळी जेव्हा वसिम खान हे दुकान उघडण्यासाठी गेले, तेव्हा त्यांना दुकानाच्या शटरचे लॉक तुटलेले दिसले. त्यांनी दुकानात पाहणी केली असता सर्व औषधे, गोळ्यांचे बॉक्स अस्ताव्यस्त पडलेले दिसले. त्यानंतर त्यांनी दुकानातील ड्रॉवर पाहिल्यावर त्याचेही लॉक तुटलेले व ड्रॉवर उघडे असल्याचे दिसून आले.

या ड्रॉवरमध्ये वसीम खान यांनी कामगारांचा पगार करण्यासाठी २८ हजारांची रोकड ठेवलेली होती. ती त्यांना दिसून आली नाही. त्यानंतर त्यांनी सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता त्यात पहाटेच्या सुमारास तोंडाला कापड गुंडाळलेले २ चोरटे दुकानाचे शटर उचकटवून आतमध्ये घुसताना व चोरी करताना दिसून आले. याबाबतची माहिती वसीम खान यांनी भिंगार कॅम्प पोलिसांना दिली. मात्र पोलिसांनी पोलिस ठाण्यात वार्षिक तपासणी सुरु असल्याने तुम्ही नंतर फिर्याद द्यायला या, असे सांगत फिर्याद न घेताच त्यांना माघारी पाठविले असल्याचा आरोप दुकान मालक वसीम खान यांनी केला आहे.

याच परिसरातील मंदिरातील दानपेटी अज्ञात चोरट्यांनी १५ दिवसांपूर्वी चोरून नेलेली आहे. तसेच भिंगारमधील विनोद पोखरणा यांचे विनोद मेडिकल चोरट्यांनी फोडले होते. त्यातही २ चोरटे चोरी करताना सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसत होते. मात्र अद्याप या चोरट्यांचा तपास लागलेला नाही.

# निवृत्त लष्करी अधिकाऱ्याच्या घरातून चोरी; सोने-चांदीच्या दागिन्यांसह रोकड लंपास

## जामखेड रोडवरील जनरल अरुण वैद्य कॉलनीतील घटना; पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर - निवृत्त लष्करी अधिकाऱ्याच्या बंद घराच्या दरवाजाचा कडी, कोयंडा, कुलूप तोडून कोणीतरी अज्ञात चोरट्याने आत प्रवेश केला. आतील सामानाची उचकापाचक करुन कपाटातील सोन्या, चांदीचे दागिने व रोख रक्कम असा ४ लाख ६० हजारांचा ऐवज चोरुन नेला. ही घटना नगर जामखेड रोड वरील जनरल अरुण वैद्य कॉलनी, भाग्योदय कॉलनी येथे २१ डिसेंबर रोजी सकाळी ९ वा. ते २७ डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजण्याचे दरम्यान घडली.

याबाबत निवृत्त लेफटनंट कर्नल सर्जेराव शिवाजी नागरे (वय ४६, रा.भाग्योदय कॉलनी जनरल अरुण वैद्य कॉलनी जामखेड रोड) यांनी सोमवारी (दि.३०) भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी नागरे हे काही कामाकरीता कुटुंबासह बाहेरगावी गेले असता त्या दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरट्याने त्यांच्या बंद घराच्या दरवाजाचे कडी कोयंडा कुलूप तोडून आत प्रवेश केला. आतील सामानाची उचकापाचक करून सामान अस्ताव्यस्त फेकले.

बेडरूममधील लोखंडी कपाटातून ९० हजार रुपये किमतीचे ६ तोळे वजनाचे एक सोन्याचे मिनी गंठण, ३० हजार रुपये किमतीच्या २३ ग्रॅम वजनाच्या पाच अंगठ्या, २० हजार रुपये किमतीचे १२ ग्रॅम वजनाचे दोन सोन्याचे कानातील जोड, ४५ हजार रुपये किमतीच्या ४५ ग्रॅम वजनाच्या तीन सोन्याच्या चैन, ३० हजार रुपये किमतीच्या २० ग्रॅम वजनाच्या लहान मुलांच्या सात सोन्याच्या अंगठ्या, ६० हजार रुपये किमतीचे ३ किलो वजनाचे चांदीचे दागिने व भांडे, २० हजार रुपये किमतीच्या ५० साड्या, १ लाख ६५ हजार रुपये रोख रक्कम असा ऐवज चोरून नेला. ते बाहेरगावहून आल्यावर त्यांना चोरीची घटना समजली. याबाबत त्यांनी पोलिसांना माहिती कळविली. या घटनेची माहिती मिळताच उप विभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती (शहर विभाग), भिंगार कॅम्पचे सहायक पोलीस निरीक्षक जगदिश मूलगीर, पोलिस उपनिरीक्षक योगेश शिंदे यांनी पोलीस पथकासह घटनास्थळी भेट देऊन घटनेची माहिती घेतली.

या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलिसांनी निवृत्त लेफ्टनंट कर्नल सर्जेराव नागरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५, ३३२ (३), ३३२ (४) प्रमाणे घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.

अधिक तपास पोलिस उपनिरीक्षक योगेश शिंदे हे करीत आहेत.

# केडगावच्या भुषणनगर येथे घरफोडी, सोने आणि चांदीच्या दागिन्यांची चोरी

नगर - बंद घराच्या गेटचे व मुख्य दरवाजाचे कडी कोयंडा, कुलूप तोडून कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी आत प्रवेश केला आतील सामनाची उचकापाचक करून घरातील १३.३३ ग्रॅम वजनाचे सोन्या चांदीचे दागिने चोरून नेल्याची घटना केडगाव उपनगरातील भूषणनगर पाण्याच्या टाकीजवळ घडली.

याबाबत प्रमोद गुलाब जासूद (वय ४०, रा. पाण्याची टाकीजवळ, भूषणनगर केडगाव, मूळ रा. भोरवाडी ता.नगर) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी जासूद हे नाताळ सणानिमित्त सुट्टी असल्याने कुटुंबासह २४ डिसेंबर रोजी त्यांच्या राहत्या घराला व्यवस्थित कुलूप लावून त्यांच्या मूळ गावी भोरवाडी येथे गेले होते, सोमवारी (दि.३०) त्यांना घराच्या शेजारी राहणारे आरेकर (पूर्ण नाव माहित नाही) यांनी फोनवरून कळविले की तुमच्या घराचे गेट उघडे दिसत आहे. असे सांगितल्याने जासुद हे ताबडतोब भोरवाडी येथून केडगाव येथील घरी आले असता त्यांना घराच्या गेटचे लॉक तूटलेले दिसले.

त्यानंतर घराचा दरवाजा पहिला असता घराच्या दरवाजाचे कुलूप ही दिसून आले नाही. त्यांनी घरात जाऊन पाहिले असता घरातील साहित्य अस्ताव्यस्त पडलेले दिसले. त्यानंतर त्यांनी बेडरूम मधील लोखंडी पेटीत रुमालात गुंडाळलेले सोन्याचे दागिने पाहिले असता ते दिसून आले नाही. यावरून त्यांची खात्री झाली की चोरट्याने त्यांच्या घरातून सोन्याचे दागिने चोरुन नेले.

याप्रकरणी कोतवाली पोलिसांनी प्रमोद जासूद यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध घरफोडीच्या गुन्ह्याची नोंद केली.

# बोल्हेगाव परिसरात भरदिवसा घरफोडी

नगर - भरदिवसा बंद घराच्या दरवाजाचे कडी कोंयडा कुलूप तोडून कोणीतरी अज्ञात चोरट्याने आत प्रवेश केला. आतील सामनाची उचकापाचक करून बेडरूम मधील कपाटातील १ लाख ३० हजार रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले. ही घटना नगर मनमाड रोडवरील बोल्हेगाव परिसरातील गांधीनगर येथील जय भोले चौक येथे २८ डिसेंबर रोजी सकाळी ८.३० ते सायंकाळी ६.३० या कालावधीत घडली.

याबाबत रोहिणी अजय शेवते (वय ४०, रा. जय भोले चौक, गांधीनगर, बोल्हेगाव) यांनी सोमवारी (दि.३०) तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी शेवते यांच्या बंद घराच्या दरवाज्याचा कडी, कोंयडा, कुलूप तोडून कोणीतरी अज्ञात चोरट्याने आत प्रवेश केला. आतील सामानाची उचकापाचक करून बेडरूम मधील कपाटातील सोन्याची पोत, चांदीचे ब्रासलेट, चांदीचे पैंजण, सोन्याची अंगठी, कानातील झुमके व रोख रक्कम असा १ लाख ३० हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात रोहिणी शेवते यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५ (अ) प्रमाणे घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


Career Disha — 2 लाखाहून अधिक विद्यार्थ्यांनी अनुभवलेला कोर्स
DCGA Diploma Course in Graphics & Office Automation
JUST IN 8900/-
GET READY FOR YOUR JOB — JOIN TODAY
MS-OFFICE | TALLY PRIME | GST | CORELDRAW | ILLUSTRATOR | PHOTOSHOP | WEB PAGE DESIGNING | BASIC HARDWARE
Duration : 6 Months
Delhi Gate Branch 9371051769
Old ST stand Branch 9371151769
Pipeline Branch 7447761769




घराची सुरक्षा
३६५ दिवस ३६० डिग्री मध्ये
ISO 9001 : 2015 Certified
Mandar Mulay
98222 94622



Ahilyanagar's 1st Dolby 7.1 & Dolby Atmos Theater
SHOW TIMING - 1 JAN - 2 JAN 2025
मु.पो. बोंबिलवाडी 1.00PM | 04.30PM 07.30PM
बेबी जॉन 09.15AM | 10.00AM 02.45PM | 10.40PM
पुष्पा - २ 12.45PM | 03.00PM 07.00PM | 09.30PM 10.30PM (3D)
मुफासा (3D) Hindi 10.00AM | 08.15PM
क्रेवेन - द हंटर Hindi 12.20PM | 05.45PM
टीप: शो च्या वेळा बदलू शकतात
Book Your Tickets at Box Office | bookmyshow
Near Nagar College, Above Zudio, A.nagar. ☏ 9881300400, 0241-2346000
Cinélife MINIPLEX


# 'विजयस्तंभ' अभिवादनासाठी येणाऱ्या अनुयायांसाठी 'विजयस्तंभ सुविधा' ॲप

## ॲपच्या सहाय्याने सुविधांपर्यंत सहजपणे पोहोचता येणार


ॲप आयकॉनवर क्लिक केल्यावर उपलब्ध करून दिलेल्या सर्व सुविधा आपल्याला दिसतात. | आवश्यक असणाऱ्या सुविधेवर क्लिक केल्यावर गुगल मॅपवरील सुविधेचे लोकेशन दिसते. लोकेशनवर क्लिक करून नेव्हिगेट बटन दाबल्यावर गुगल नेव्हिगेटर ॲक्टिव होतो. | सदर गुगल नेव्हिगेटरच्या माध्यमातून आपण इच्छित सुविधेच्या ठिकाणी पोहचतो.

पुणे - पेरणे फाटा येथे १ जानेवारी विजयस्तंभास अभिवादन करण्यासाठी येणाऱ्या अनुयायींना तेथील सुविधांची माहिती मिळावी यासाठी जिल्हा परिषदेने 'विजयस्तंभ सुविधा' उपयोजक (ॲप) तयार केले असून त्याचे उद्घाटन शनिवारी (दि. २८) सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते करण्यात आले. या ॲपचा उपयोग करून अनुयायांना शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सुविधांपर्यंत सहजपणे पोहोचता येणार असल्याचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील यांनी सांगितले.

पेरणे येथे दरवर्षी लाखोंच्या संख्येने अनुयायी विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी ३१ डिसेंबर व १ जानेवारी रोजी येत असतात. शासनाच्यावतीने त्यांना बससेवा, आरोग्य सेवा, स्तनदा मातांसाठी हिरकणी कक्ष, शौचालय सुविधा, निवारा कक्ष, पिण्याचे पाणी, पोलीस मदत कक्ष आदी विविध सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात. या सुविधांपर्यंत अनुयायांना लवकरात लवकर पोहोचता यावे व त्यांचा लाभ घेता यावा यासाठी 'विजयस्तंभ सुविधा' ॲप तयार करण्यात आले आहे.

हे ॲप https://initiatorstechnology.com/VijayStambhSuvidha.apk या लिंकवरून डाउनलोड करून मोबाईलमध्ये इन्स्टॉल करावे. या ॲपमध्ये अनुयायांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या सर्व सुविधांचे गुगल लोकेशन मॅपिंग करण्यात आले आहे. त्यामुळे ॲपवर क्लिक केल्यानंतर आपल्याला आवश्यक त्या सुविधा निवडल्यास त्या सुविधेपर्यंत पोहोचण्याचा मार्ग गुगल मॅपवर दिसतो व अनुयायांना इच्छित सुविधेपर्यंत पोहोचणे सोपे जाते, अशीही माहिती श्री. पाटील यांनी यावेळी दिली.


VAISHNAVI TILES & TRADING CO.
• सर्व प्रकारच्या टाइल्स • ग्रॅनाइट • सॅनिटरी वेअर
• पीव्हीसी पाईप्स आणि फिटिंग • C.P. फिटिंग्ज
9590151515 | 9262515151
प्लॉट नं.5, हुंडेकरी शोरूमच्या मागे, सावेडी, अहमदनगर
VARMORA | KERAKOLL | CARYSIL | colortile | RAK | NIRALI | TIMEX | ICON



|| १० वे पुण्यस्मरण ||



क्षणोक्षणी आमच्या मनी
तुमचीच आहे आठवण,
हीच आमच्या जीवनातील
अनमोल अशी साठवण..

स्व.सौ. आरती सारंग उदावंत
स्व. दि. ३१/१२/२०१४

आपल्या पावन स्मृतीस
भावपूर्ण श्रद्धांजली

दुःखांकित
नंदकिशोर रामचंद्र उदावंत
सारंग नंदकिशोर उदावंत | शाम हरिभाऊ देडगांवकर
गणेश नंदकिशोर उदावंत | राहुल शाम देडगांवकर
चि. सिध्दांत सारंग उदावंत (मुलगा) | चि. वर्णिका सारंग उदावंत (मुलगी)
समस्त उदावंत व देडगांवकर परिवार.. मो. 9422220132/9822182333

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com


## नववर्षानिमित्त नवविचार...

कृष्णद्वैपायन महर्षी वेदव्यास या पुस्तकात लेखिका डॉ. भारती सुदामे या मानवतेचे चिरंतन, ब्रह्मस्वरूप, पूजनीय महर्षी व्यासांना कळकळीची विनंती करतात, त्या म्हणतात, ''एक कळकळीची विनंती होती आपल्याकडे पितामह, होय पितामह म्हणूनच. या आपल्या पौत्रांवर एक लहानसा उपकार कराल? आपलेच काही गुण संक्रमित कराल आजच्या मानवात. आज खूप विखुरला आहे हो तुमचा मानव. कलियुगात भयंकर परिवर्तनाची, चिंता करण्याची वेळ खरंच आली आहे.

मला खूप काही नको, पण एक साधी सद्‌बुद्धी असावी मानवांमध्ये असे वाटते. प्रत्येक गोष्टीचा, अगदी मनाचा, बुद्धीचा, भावनांचा, श्रद्धांचा एवढंच नव्हे तर अश्रूंचा सुद्धा व्यापार करायला शिकला आहे आजचा मानव.

फार काही अपेक्षा नाही फक्त या मानवानं थोडा सारासार विचार करावा.

वाचनीय मननीय — प्रेरणादायी अक्षर धन — संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१



आपल्या पलीकडेही एक खूप सुंदर जग आहगे आणि ते आपल्याला वाचवायचं आहे, एवढंच छोटंसं भान यावं त्याला.

देवर्षी, महर्षी आपण खूप प्रयास केलेत परमेश्वराच्या निकट असलेल्या मानवाला वाचवायचे, पण आज तो खूप दूर गेला आहे त्याच्या हृदयस्थ नारायणापासून...

प्रेम, परोपकार, सर्व मनुष्य समभाव विसरून केवळ स्वार्थ, अनाचार, अत्याचार, भ्रष्टाचार व सामाजिक अहितात जखडलेल्या मानवी हृदयात या भावना उत्पन्न होऊन सगळ्यांचे सकारात्मक चिंतन व भले व्हावे ही नववर्षाच्या उगवतीचे आशेचे किरण होवोत...

# पीओपीमुळे प्रदूषण होत नसल्याने महापालिकेने गणेश मूर्तीकारांवरील कारवाई तातडीने थांबवावी

## जिल्हा मूर्तीकार संघटनेचे सभापती राम शिंदे यांना निवेदन; नाव नोंदणी करण्याची आयुक्त यशवंत डांगे यांची सूचना

नगर – पीओपी मुळे कुठलेही प्रदूषण होत नसून महापालिकेच्या वतीने होणारी कारवाई त्वरित थांबवावी अशा आशयाचे निवेदन अहमदनगर जिल्हा गणेश मूर्तिकार संघटनेने महाराष्ट्र राज्य विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांना दिले आहे. यावेळी संघटनेचे अध्यक्ष भरत निंबाळकर, उपाध्यक्ष सुशील देशमुख, संतोष रायपिल्ली, भाजपचे कार्यकारणी सदस्य वसंत लोढा, केतन सोनवणे, संजय देवगुणे, संदीप सुसरे, ज्ञानेश्वर राजापुरे, सुवास ठाकूर, विवेक लोटके, उदय अनभुले आदींसह गणेश मूर्तिकार उपस्थित होते.



महानगरपालिकेने गणेश मुर्तीकारांना दिलेल्या नोटीसीनुसार अहमदनगर जिल्हा गणेश मूर्तिकार संघटनेने महाराष्ट्र राज्य विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांना पीओपी मुळे कुठलेही प्रदूषण होत नसून होणारी कारवाई त्वरित थांबवावी अशा आशयाचे निवेदन देण्यात आले. (छाया – समीर मन्यार)

मूर्तीकारांनी संघटनेने यापूर्वी महानगरपालिकेला पी.ओ. पी. प्रदूषण करत नसल्याचे पुरावे सादर केलेले आहेत. तसेच इतर १६० पानी कागदपत्रांसह शास्त्रज्ञांच्या 'डोळस पर्यावरण' ह्या पुस्तकासह सर्व पुरावे सादर केलेले असून दीपक केसरकर यांनी विधान परिषदेमध्ये २७/७/२०२४ रोजी पी.ओ.पी. संदर्भात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देतांना सांगितले होते की, पी.ओ. पी. मुर्तीचे उत्पादन आणि विक्रीवर कोणत्याही प्रकारची बंदी नाही. त्याच वेळी मुर्तीकार संघटनेने आमचे म्हणणे व मागण्या या बाबत महानगरपालिकेने सी.पी.सी.बी. आणि एम.पी. सी. बी. यांना कळवावे असे अर्जात नमुद केलेले होते. महानगरपालिकेने न्यायालयाकडून आलेल्या तसेच एम.पी.सी.बी. कडून आलेल्या आदेशाचे पत्र मूर्तिकारणा दिलेले नाही.


सर्वत्र गणेश विसर्जन हे कृत्रिम तलावात होत असतांना प्रदुषणाचा खोटा बहाणा करून जबरदस्ती पी.ओ.पी. बंदी लादण्यात येत आहे. मुर्तीकारांना बेरोजगारीच्या संकटात लोटण्यात येत आहे. इतर कंपन्यांकडून नद्यांमधे केमिकल युक्त पाणी दररोज सोडले जाते. तसेच उस कारखान्याच्या मळीयुक्त पाण्याचाही त्यात समावेश असतो. आणि महत्वाचे म्हणजे शहरी वस्तीतील सांडपाणी, ड्रेनेजचे पाणी सर्रास दररोज नद्यांमध्ये सोडले जाते त्या विषयी प्रदुषणाची गंभीर समस्या रोज उद्‌भवत असतांना आमच्या मुर्त्यांच्या एक दिवसीय विसर्जनाला का टार्गेट केले जाते? पी.ओ. पी. च्या गणेशमुर्ती दरवर्षी जास्तीत जास्त प्रमाणात आंध्र प्रदेश, तेलंगणा, मध्य प्रदेश, गुजरात, या राज्यात वितरीत होतात. तेथे कुठल्याही प्रकारची बंदी नाही. मग आमच्यावर बंदीची टांगती तलवार का?

इतर राज्यातील व्यापाऱ्यांच्या ऑर्डर्स पूर्णपणे देण्यासाठी पी.ओ. पी.च्या मुर्ती बनवणारच आहोत आणि बनवाव्याच लागतील. तो आमच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न आहे. संविधानाने तसा व्यवसायाचा हक्क आम्हाला दिलेला आहे. आम्ही महाराष्ट्रातील प्रत्येक गावातील मुर्तीकार आहोत. आणि सर्वसामान्यांना परवडणाऱ्या पी.ओ.पी. च्या गणेशमुर्ती वर्षभर बनवित असतो. त्यावरच आमच्या हजारो कुटूंबांचा उदरनिर्वाह चालतो. परंतु केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या नव्या जाचक अटींमुळे पी.ओ.पी. मुर्तीवर बंदी आल्यास आम्ही आमच्या कुटुंबासह रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याची वेळ येऊ शकते. त्यामुळे गणेश मूर्ती कारांवर उपासमारीची वेळ येऊ शकते असे निवेदनात म्हटले आहे.

यावेळी आयुक्त यशवंत डांगे यांच्याशी संघटनेने चर्चा करून त्यांना पीओपीमुळे कोणत्याही प्रकारचे प्रदूषण होत नसल्याचे पुरावे सादर करून गणेश मूर्तीकारावर होणारी कारवाई थांबवावी अशी मागणी केली. आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की मूर्तिकारांनी ही प्रशासनाला सहकार्य करावे शहरातील सर्व मूर्तिकारांची महानगरपालिकेत नाव नोंदणी करावी जेणेकरून मनपाच्या वतीने मूर्तिकारांना सुविधा देण्यास मदत होईल.

यावेळी भाजपचे कार्यकारणी सदस्य वसंत लोढा म्हणाले की, यापूर्वीही जिल्हा गणेश मूर्तिकार संघटनेने महानगरपालिकेकडे पीओपीमुळे कुठल्याही प्रकारचे प्रदूषण होत नसल्याचे पुरावे सादर केले आहेत, तरीही महानगरपालिकेने मूर्तिकार संघटनेवर कारवाईचा बडगा उपसला आहे. शहरातील गणेश मूर्तींना देशभरात मोठी मागणी असते. गणेश मूर्ती ह्या देशभरात प्रसिद्ध आहेत अनेक कुटुंब यावर आपला उदरनिर्वाह चालवतात त्यांच्यावर उपासमारीची वेळ येऊ नये यासाठी महापालिकेने गणेश मूर्तिकारांवर होणारी कारवाई थांबवावी, असे ते म्हणाले.

# मार्कंडेय मंदिर जीर्णोद्धाराचा १ जानेवारी रोजी शुभारंभ



नगर – गांधी मैदान येथील श्री मार्कंडेय देवस्थानच्या मंदिराच्या जीर्णोद्धार कामाचा शुभारंभ २०२५ या नवीन वर्षाच्या मुहूर्तावर १ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते, शहर भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष महेंद्र गंधे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असल्याची माहिती ट्रस्टचे अध्यक्ष श्रीकांत छिंदम यांनी दिली.

गांधी मैदान येथील या ऐतिहासिक मंदिराचा जीर्णोद्धार व्हावा अशी सर्व समाजातील नागरिकांची व भाविकांची बऱ्याच वर्षांपासून मागणी होती. त्यानुसार देवस्थान ट्रस्टच्या कमिटीने नवीन वर्षाच्या सुरवातीलाच १ जानेवारी रोजी मंदिराच्या जीर्णोद्धार कामास सुरुवात करण्याचा निर्णय घेत भूमिपूजन सोहळ्याचे आयोजन केले आहे, अशी माहिती ट्रस्टचे उपाध्यक्ष मनोज दुलम यांनी दिली.

भूमिपूजनास नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन मार्कंडेय देवस्थान ट्रस्टचे सरचिटणीस प्रकाश कोटा, खजिनदार अजय म्याना आदींसह ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी व अखंड पद्मशाली समाजाच्या वतीने केले आहे.

# विटभट्टीवरील चिखल मिक्सरमध्ये साडीचा पदर गुंतून महिलेचा मृत्यू

नगर – विटभट्टीवरील चिखल मिक्सर मशीन मध्ये साडीचा पदर गुंतल्याने त्यात ओढले जावून महिलेचा मृत्यू झाल्याची घटना बोल्हेगाव येथील विटभट्टीवर घडली. विजया अमोल गाडे (वय ३०, रा. बोल्हेगाव गावठाण) असे या मयत महिलेचे नाव आहे.

मयत विजया गाडे व त्यांचे पती हे मुळचे निंबोडी (ता.नगर) येथील रहिवासी असून ते दोघे बोल्हेगाव येथील बाळासाहेब वाकळे यांच्या विटभट्टीवर मजुरी करत होते. १९ डिसेंबर रोजी विटभट्टीवर काम सुरु होते. चिखल मिक्सर मशीन हे टॅक्टरला जोडलेले होते. या मिक्सर मशीन मध्ये काही चिखल शिल्लक राहिला का हे पाहण्यासाठी मयत विजया या मशीनवर चढल्या. त्यावेळी टॅक्टर चालकाने मशीन बंद न करता चालूच ठेवल्याने विजया यांच्या साडीचा पदर फिरत्या रॉड मध्ये गुंतून त्या मिक्सर मशीनमध्ये जोरात ओढल्या जावून गंभीर जखमी झाल्या. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्यांना उपचारापूर्वीच मयत घोषित केले. या प्रकरणी प्रारंभी तोफखाना पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती. या प्रकरणाची चौकशी केल्यानंतर मयत विजया यांचे पती अमोल मच्छिंद्र गाडे (रा. बोल्हेगाव, गावठाण) यांच्या फिर्यादी वरून पोलिसांनी टॅक्टर चालक तेजस बाबासाहेब आंबेकर (रा. विळद, ता.नगर) याच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०६ नुसार गुन्हा दाखल केला आहे.

# जप्त केलेल्या वाहनांचा जाहीर लिलाव होणार

नगर – तालुक्यात अवैधरित्या गौणखनिज उत्खनन करुन वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या मालकांनी दंडात्मक कार्यवाहीत आदेशातील रक्कम शासन जमा न केल्याने ही रक्कम वसूल करण्यासाठी २ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता तहसील कार्यालय, अहिल्यानगर जवळील गंगा उद्यानाच्या मागील बाजूस जप्त केलेल्या वाहनांचा लिलाव करण्यात येणार आहे.

लिलावात भाग घेण्याचा अर्ज, लिलाव होणाऱ्या जंगम मालमत्तेची किंमत, अनामत रक्कम, तसेच लिलावाच्या अटी व शर्तीकरिता तहसीलदार अहिल्यानगर यांच्याशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे तहसीलदार संजय शिंदे यांनी कळविले आहे.

# विषारी औषधाचे सेवन केलेल्या युवकाचा उपचारादरम्यान मृत्यू

नगर – विषारी औषधाचे सेवन केल्याने उपचार सुरू असलेल्या युवकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. अजय दादासाहेब केदार (वय २५, सध्या रा. एमआयडीसी) असे मयत युवकाचे नाव आहे.

त्याने एमआयडीसी येथील रेणुकामाता मंदिरजवळ विषारी औषधाचे सेवन केले. त्याच्या आईने त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचार सुरू असतानाच त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. अधिक तपास पोलिस करत आहेत.

# चोरी करणारा आरोपी पकडला पण दागिने हस्तगत होईनात

## तपासाबाबत संशय, फिर्यादी महिलेचे पोलिस अधीक्षकांना निवेदन

नगर – घरफोडी करणारा आरोपी पोलिसांनी पकडला, त्याने चोरी केल्याचे कबूल करून सोने सोनाराला विकले असल्याचे सांगितले. पोलिसांनी सोनाराकडे चौकशी केली परंतु सोनार म्हणतो आता माझ्याकडे सोने नाही. अशी उत्तरे तोफखाना पोलिसांकडून मिळत असल्याने त्यांचा तपास संशयास्पद आहे. त्यामुळे पोलिसांना योग्य तपास करायला लावून चोरीतील सोने हस्तगत करावे अशा मागणीचे निवेदन फिर्यादी असलेल्या शिक्षिकेने पोलीस अधीक्षक यांना दिले आहे.

श्रीमती आशा विजय साके (रा शिवाजीनगर, कल्याण रोड) यांच्या घरी कोणी नसताना दि. २० सप्टेबर रोजी अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराचे कुलूप तोडून घरातील सुमारे १२ तोळे सोन्याचे दागिने चोरून नेले होते. याबाबत साके यांनी दिलेल्या फिर्यादी वरून तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या गुन्ह्याचा तपास करत तोफखाना पोलिसांनी आरोपीला अटक केली. अटक आरोपीने चोरी केल्याची कबुली दिली व चोरलेले सोन्याचे दागिने सोनाराला विकले असल्याचे सांगितले. पोलीसांनी सोनाराला ताब्यात घेतले. परंतु सोन्याची रिकव्हरी झाली नाही असे सांगण्यात आले. सोनार माझ्याकडे सोनेच शिल्लक नाही असे म्हणतो. असे पोलीसांकडून फिर्यादी साके सांगण्यात आले. तसेच त्या सोनाराला मरेपर्यंत तर आम्ही मारू शकत नाही असे त्यांना सांगण्यात आले. पोलीस जर अशी उत्तरे देत असतील तर आम्ही न्याय कोणाकडे मागावा, असे या निवेदनात त्यांनी म्हटले आहे.

आशा साके यांच्या पतीचे २००७ मध्येच निधन झालेले आहे. त्यांनी त्यांच्या मुलीच्या लग्नासाठी बनवलेल्या दागिन्यांची चोरी झाली आहे. त्यामुळे त्यांना पोलिसांच्या योग्य तपासाची अपेक्षा आहे. परंतु पोलिसांची अशी उत्तरे ऐकून त्या हतबल झाल्या आहेत. या गुन्ह्याचा योग्य रीतीने तपास व्हावा अशी मागणी त्यांनी निवेदनात केली आहे. जर चोर सापडला सोनार सापडला तर सोने हस्तगत व्हावे अशी मागणी त्यांनी केली.



हैदराबाद येथील सिटाडेल हॉटेल मध्ये मोटिवेशनल स्पीकर जया किशोरी यांच्या हस्ते १८३ विश्वविक्रम करणारे १ ले भारतीय प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचे ध्यानधारणा प्रशिक्षक ब्रह्माकुमार डॉ. दीपक हरके यांना भारताच्या प्राचीन राजयोगाचा प्रसार व प्रचार करण्यासाठी ग्लोबल बुक ऑफ एक्सलेन्स, इंग्लंड च्या वतीने प्राईड ऑफ इंडिया अवॉर्डने सन्मानित करण्यात आले. यावेळी ग्लोबल बुक ऑफ एक्सलेन्स, इंग्लंडचे अध्यक्ष मनीष कुमार अगरवाल उपस्थित होते.

# २ दुचाकींच्या समोरासमोरील धडकेत युवकाचा मृत्यू

## नगर – पाथर्डी रोडवर कौडगाव शिवारातील घटना

नगर – २ दुचाकींची समोरासमोर धडक होवून झालेल्या अपघातात एका दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना रविवारी (दि.२९) रात्री ८.१५ च्या सुमारास नगर – पाथर्डी रोडवर कौडगाव गावचे शिवारात घडली. विनोद मच्छिंद्र ठोंबे (वय ३७, रा. खांडके, ता.नगर) असे मयताचे नाव आहे.



विनोद ठोंबे (मयत)

मयत विनोद ठोंबे हा रविवारी रात्री त्याच्या हिरो कंपनीच्या स्प्लेंडर मोटारसायकलवर (क्र. एमएच १६ ए डब्लु ४७७५) नगरहून कौडगाव मार्गे खांडके गावाकडे जाण्यासाठी नगर पाथर्डी रोडने चाललेला असताना कौडगाव गावच्या शिवारात पाथर्डीकडून भरधाव वेगात आलेल्या हिरो कंपनीच्या स्प्लेंडर प्लस मोटारसायकलने त्याच्या मोटारसायकलला समोरून जोराची धडक दिली. या धडकेने तो रस्त्यावर पडून गंभीर जखमी झाला. त्याला काही नागरिकांनी तातडीने रुग्णवाहिका बोलावून उपचारासाठी रुग्णालयात नेले. मात्र डॉक्टरांनी त्यास उपचारापूर्वीच मयत घोषित केले.

या प्रकरणी मयत विनोदचा भाऊ सचिन मच्छिंद्र ठोंबे (वय ३५, रा. खांडके, ता.नगर) याने नगर तालुका पोलिस ठाण्यात सोमवारी (दि.३०) फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी मोटारसायकल चालक बाळू बलभीम बडे (रा. टाकळी मानूर, ता.शिरूर कासार, जि. बीड) याच्या विरुद्ध अपघाताचा गुन्हा दाखल केला आहे. मयत विनोद ठोंबे याच्यावर सोमवारी (दि.३०) दुपारी खांडके गावात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच्या पश्चात पत्नी, २ मुले, २ भाऊ असा परिवार आहे.

# गंभीर गुन्ह्यातील फरार आरोपीस पाठलाग करुन पकडले

## नाकाबंदी दरम्यान एमआयडीसी पोलीसांच्या पथकाची कारवाई

नगर – एमआयडीसी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यात फरार असलेला करण नंतर काळे, (वय २८, रा. उघड मळा, वडगाव गुप्ता, अ.नगर) यास नाकाबंदी मध्ये एमआयडीसी पोलिसांनी पाठलाग करून शिताफीने पकडले.

या बाबतची माहिती अशी की एमआयडीसी पोलिस सहयाद्री चौक, एमआयडीसी येथे नाकाबंदी करीत असताना सहायक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांना महिती मिळाली की एमआयडीसी पोलिसांना पाहिजे असलेला फरार आरोपी करण काळे हा नगर मनमाड महामार्गाने त्याचे राहते घरी जाणार आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने त्यांनी पोलिस पथकास ही माहिती देऊन कारवाई करण्याचे आदेश दिले. पोलिस पथकाची त्या ठिकाणी नाकाबंदी चालु असताना एक इसम हा पल्सर मोटारसायकल वर तोंडाला रुमाल बांधून संशयीतरित्या गाडी घेऊन येताना दिसला. त्या इसमाचा संशय आल्याने त्यास हात करुन गाडी बाजुला घेण्यास सांगीतले असता त्याने त्याची मोटार सायकल ही भरधाव वेगाने चालवून पळून जावू लागला. तेव्हा पोलिसांनी त्याचा पाठलाग करुन शिताफीने त्यास पकडले. तो करण काळेच असल्याचे स्पष्ट झाले.



गंभीर गुन्ह्यातील फरार आरोपीस पाठलाग करुन पकडल्यानंतर त्याच्या समवेत एमआयडीसी पोलिसांचे पथक.

करण काळे, याच्यावर भा. दं वि. कलम ३९५, ४२० प्रमाणे १, भा. दं वि. कलम ३६४ ४५२, ३२४, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७, १४९ प्रमाणे सह बाल लैगीक अत्याचार कायदा कलम १२ सह बाल न्याय (काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ चे कलम ७५ प्रमाणे १ असे दोन गुन्हे दाखल आहेत.

सदर कारवाई सहायक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक विनोद परदेशी, आढाव, पोलीस अंमलदार म्हस्के, नेहुल, फकीर शेख, गणेश पालवे, महेश बोरुडे, नवनाथ दहीफळे, सचिन नागरे यांचे पथकाने केली आहे.

# अविनाश फळे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन



नगर – येथील अविनाश गोविंदराव फळे यांचे (वय ६५) हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयामध्ये त्यांनी अनेक वर्ष सेवा बजावली. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, सून नातू असा परिवार आहे. ते पत्रकार डॉ. अनिल फळे यांचे बंधू व भारत पेट्रोलियमचे अहिल्यानगरचे व्यवस्थापक युवराज फळे यांचे ते वडील होते.

# तपोवन रोडवरील दारू अड्ड्यावर छापा

नगर – बेकायदेशीर रित्या गावठी हातभट्टीची दारू विक्री करणाऱ्या दारू अड्ड्यावर तोफखाना पोलिसांनी छापा टाकून ५ हजार रुपये किमतीची ५० लिटर गावठी हातभट्टीची तयार दारू पकडली.या कारवाईत एकास ताब्यात घेतले. हि कारवाई तपोवन रोड, जुना पिंपळगाव रोडचे पूर्व दिशेस असलेल्या दारू अड्ड्यावर केली.

तपोवन रोड, जुना पिंपळगाव रोडच्या पूर्व दिशेस असलेल्या मोकळ्या पटांगणात देविदास मल्लू शिंदे (रा.वैदुवाडी) हा गावठी हातभट्टी दारूची विक्री करीत असल्याची माहिती तोफखाना पोलिसांना मिळाली.पोलीसांनी तत्काळ त्या ठिकाणी जाऊन खात्री केली असता तेथे बरेच लोक उभे असलेले दिसले तेथे शिंदे हा गावठी दारू विक्री करीत असताना दिसला.पोलिसांनी तेथे अचानक छापा टाकून त्याला पकडले. त्याची झडती घेतली असता, त्याच्या जवळ एक गोणीमध्ये प्लास्टिकच्या बाटल्यामध्ये एक लिटरच्या दारू भरलेल्या ५० बाटल्या अशी ५० हजार रुपये किमतीची ५० लिटर दारू मिळून आली.

या प्रकरणी तोफखाना पोलिसांनी पो. ना. रमेश शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन देविदास शिंदे याच्या विरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये गुन्ह्याची नोंद केली.

# तीन मटका अड्ड्यावर पोलिसांची कारवाई

नगर – लोकांकडून पैसे घेऊन कागदाच्या चिठ्ठ्यावर आकडे लिहून कल्याण मटका जुगार चालवणाऱ्या तीन मटका जुगार अड्ड्यावर कोतवाली पोलिसांनी छापा टाकला या कारवाईत ३ हजार ७०रुपये किमतीच्या मुद्देमालासह तिघांना ताब्यात घेतले. ही कारवाई माळीवाडा येथील अप्सरा टॉकीज, फुलसौदर चौक जवळ, रेल्वे स्टेशन वरील माल धक्का शेजारी, जुना टिळक रोडवरील सुमतीलाल सिमेंट गोडाऊन जवळ केली.

माळीवाडा येथील फुलसौदर चौक, शिवम टॉकीज जवळ असलेल्या मटका अड्ड्यावर विष्णू बाबुराव दळवी (वय ७०, रा. देशमुख गल्ली, चौपाटी कारंजा), रेल्वे स्टेशन वरील माल धक्का च्या शेजारी एका गळ्यामध्ये सुरू असलेल्या मटका अड्ड्यावर सद्दाम सुलेमान शेख (वय ३१,रा.मिसाळ गल्ली केडगाव), जुना टिळक रोड येथील सुमतीलाल सिमेंट गोडाऊन च्या आडोशाला कांतीलाल शरद सीतापुरे (वय ४३, रा. सिद्धार्थनगर) यांच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे. त्यांच्या विरुद्ध कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीस अंमलदार संदीप पितळे, दीपक रोहकले, सुरज कदम, सोमनाथ राऊत, सचिन लोळगे, संकेत धीवर, महिला पोलिस अंमलदार रोहिणी दरंदले यांनी ही कारवाई केली.

# गृहिणी

## आरोग्य

### रात्री मोजे घालून झोपणे हिताचे

थंड वातावरणात रात्री मोजे घालून झोपणे आरामदायक वाटते. बरेच लोक दिवसाच नव्हे तर रात्रीच्या वेळी थंड वातावरणात मोजे घालतात, परंतु ते आरोग्यासाठी चांगले आहे. मोजे घातल्याने पायांमध्ये रक्ताभिसरण सुधारते, ज्यामुळे पाय दुखणे आणि सूज कमी होते. तसेच उबदार पाय रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास मदत करतात.

## पाककला

### वऱ्याच्या तांदळाचा शिरा

**साहित्य :** एक वाटी वऱ्याचे तांदूळ, एक वाटी साखर, अर्ध्या वाटीस थोडे कमी तूप, बदाम, बेदाणे व वेलदोडे

**कृती :** वऱ्याचे तांदूळ जाडसर दळून घ्यावेत. हे पीठ चाळून घेऊ नये. पीठ तुपावर तांबूस भाजावे. नंतर जेवढे पीठ असेल, त्याच्या दुप्पट आधणाचे पाणी घालावे व नेहमीच्या रव्याच्या शिऱ्याप्रमाणे शिरा करावा. तांदूळ जुने असतील, तर पाणी थोडे जास्त घालावे.

## वास्तू सल्ला

### अखंड सौभाग्यासाठी

✽ चांदी हे सुख-समृद्धीचे प्रतिक मानले जाते हे तुम्हाला माहीत आहेच, त्यामुळे विवाहित महिलांनी सिंदूर मढवलेल्या पेटीत चांदीचा मोर ठेवावा. यामुळे त्यांना अखंड सौभाग्याचे वरदान मिळेल.

✽ वाळलेल्या तुळशीचे रोपटे चुकूनही जाळू नका अशुभ मानले जाते.

फळे कापल्यानंतर थंड पाण्यात ठेवा. रंग बदलण्याची प्रक्रिया मंदावते.

## सौंदर्य

लाल कोरफडीचे जेल थेट प्रभावित भागावर लावा आणि हलक्या हाताने मसाज करा. रात्रभर राहू द्या आणि सकाळी कोमट पाण्याने चेहरा धुवा. मुरुमे कमी होतील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. १ जानेवारी २०२५

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, पौष शुक्लपक्ष, उ.षा. २३|४६, सूर्योदय ०६ वा. ३३ मि. सूर्यास्त ०६ वा. ०४ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** आर्थिक आणि सामाजिक कामांमुळे अडथळे. शब्दाने शब्द वाढवू नका. आर्थिक स्थितीत सुधारणा.

**वृषभ :** गुंतवणूक विचारपूर्वक करा. मित्रांबरोबर वेळ जाईल. नवे संबंध बनतील. मिळकतीतून लाभ प्राप्ति योग.

**मिथुन :** दृढ निश्चयामुळे कामात विजय मिळेल. मित्रांचा सहयोग मिळेल. धनलाभ होईल.

**कर्क :** विशेष वित्तीय अडचणींवर चिंतन कराल. घरात मंगल कार्याचा योग. आर्थिक क्षेत्रात संयमाने वागाल.

**सिंह :** आहारावर विशेष लक्ष द्याल. भूमि, वाहनामुळे लाभ होईल. आनंद वाटेल. खाण्या पिण्यावर नियंत्रण ठेवाल.

**कन्या :** आवडत्या छंदासाठी वेळ, पैसे खर्च कराल. तुमच्या सार्मथ्यात वाढ. आवास संबंधी समस्या सुटतील.

**तूळ :** आय-व्ययमध्ये संतुलन राहील. मानसिक अस्थिरता दूर होईल. आनंदाची बातमी कळेल.

**वृश्चिक :** आळस केल्याने कामे वेळेवर होणार नाहीत. आनंददायी बातमी कळेल. घरातील व्यक्तिशी वाद होऊ शकतो.

**धनु :** निर्णय घेण्यात दुविधा राहील ज्यामुळे कामाची गति बाधित होऊ शकते.

**मकर :** आध्यात्मा संबंधी कामांमध्ये विशेष लाभ प्राप्ति योग. कौटुंबिक सुख लाभेल. तब्येतीत सुधारणा होईल.

**कुंभ :** जोडीदारा बरोबर तणाव ठेऊ नका. मतभेदांपासून लांब रहा. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**मीन :** अधिकारांचा योग्य उपयोग करून घ्याल. मनावरील दडपण दूर. पितृचिंता सतावेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

एका दुकानाचे मालक आपल्या दुकानातील सहाय्यकाला म्हणाले, 'तु एक गोष्ट लक्षात ठेव. ग्राहक राजा आहे. ग्राहकहित महत्त्वाचे आहे. मघाशी तु एका ग्राहकाबरोबर भांडताना मी तुला पाहिले आहे. तु हे प्रकार टाळले पाहिजेस. आता मला सांग मघाशी तु का भांडत होतास?' सहाय्यक म्हणाला, 'तो ग्राहक म्हणाला, तुझा मालक मुर्ख आहे'

डॉक्टरने रुग्णाला सांगितले, ''तुम्हाला कुत्रा चावला आहे. तुम्हाला रेबीज झाला आहे.'' रुग्णाने तात्काळ कागद मागितला. डॉक्टर म्हणाले, ''थांबा. लगेच मृत्युपत्र लिहिण्याची गरज नाही''. रुग्ण म्हणाला, ''मी मृत्युपत्र लिहीत नाही. कुणाकुणाला चावायचे त्यांची यादी बनविणार आहे.''

# जागतिक आश्चर्ये


### अमेरिकेतील ऑकलंड विद्यापीठ

अमेरिकेतील ग्लीन इमारत टॉप अल्ट्रा पॉवरने सुसज्ज आहे. या बिल्डींगमध्ये जास्तीत जास्त प्लॅटिनम अशा अति मौल्यवान धातूचा वापर केलेला आहे. तो ऑकलंड येथील व्यावसायिक प्रशिक्षण केंद्राचा विभाग आहे.

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७०८३


सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) विचलित नसलेले; स्थिर ४) इमारत; भुवन; वास्तू; बिल्डिंग ६) मला ७) एक पौष्टिक फळ ज्याच्यापासून खारीक बनते ८) करंजीसारखा एक खाद्यपदार्थ ९) लग्नानंतर निघणारी वधुवराची मिरवणूक ११) प्रपंचरूपी समुद्र १३) कर्माचा मनावर राहणारा संस्कार १५) द्वार; दार; दरवाजा १८) हिंदू वर्षाचा अकरावा महिना २०) दाबून टाकणे; संयमन २२) पंख; दुसरा २३) एक चर्मवाद्य; मृदंग; पखवाज

**उभे शब्द :-** १) अमुक; फलाणा २) ओसाड जागेतील वास्तव्य ३) पराकाष्ठेचा लाभ ४) विश्वास; खात्री ५) नव्याने; अलीकडे; अलीकडचे १०) क्रोध; त्वेष १२) बैलाच्या मानेवरचा उंचवटा १३) बेताल; मर्यादेपेक्षा जास्त १४) श्वासोच्छ्वास करण्याचे इंद्रिय १६) वितरण; वाटणी १७) कांचन; सुवर्ण; सोने १९) निवासस्थान; गेह; गृह २०) औषध (हिंदी, उर्दू) २१) सुखदुःख जाणणारे इंद्रिय

### शब्दगंध क्र. ७०८२ चे उत्तर



# मुलांचे विश्व

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** कानाने ऐकलं तर फक्त शब्दांचा आवाज येतो, मनाने ऐकलं तर शब्दांचा अर्थ समजतो.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### कापडाचा शोध कधी व कोणी लावला?

कापडाचा शोध कोणी आणि कधी लावला हे अचूकपणे सांगणे कठीण आहे, कारण कापड तयार करण्याची तंत्रज्ञान एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वेगवेगळ्या वेळी विकसित झाली. तथापि, पुरातत्वीय पुराव्यांवरून असे दिसून येते की कापडाचा वापर सुमारे १०,००० वर्षांपूर्वी सुरू झाला होता.

कापडाचा शोध प्रथम मध्य पूर्वेत लावला गेला असावा, जिथे लोकांनी नैसर्गिक तंतूंचा वापर करून कापड तयार करण्यास सुरवात केली. या तंतूंमध्ये लाकूड, पाने, झाडाची साल, प्राणी केस आणि धातू यांचा समावेश होता.

कापडाचा वापर प्रथम वस्त्र म्हणून केला गेला होता, परंतु नंतर तो इतर अनेक उद्देशांसाठी वापरला जाऊ लागला. उदाहरणार्थ, कापडाचा वापर घरगुती वस्तू, साधने आणि सजावटीसाठी केला जाऊ लागला. कापडाचा शोध मानवी संस्कृतीतील एक महत्वाचा टप्पा होता. कापडाने लोकांना अधिक आरामदायक कपडे घालण्यास अनुमती दिली, तसेच त्यांना घरे, साधने आणि सजावट तयार करण्यात मदत केली. भारतात, कापडाचा वापर सुमारे ५,००० वर्षांपूर्वी सुरू झाला असावा. प्राचीन भारतात, कापडाचा वापर वस्त्र, बेड लिनन, घरगुती वस्तू आणि धार्मिक अनुष्ठानांसाठी केला जात असे. भारतात कापडाच्या उत्पादनात आणि निर्यातीत महत्त्वाची भूमिका बजावणारे काही प्राचीन शहरांमध्ये मथुरा, काशी आणि कपिलवस्तु यांचा समावेश होतो. आज, कापड हे जगभरातील लोकांद्वारे वापरले जाणारे सर्वात सामान्य प्रकारचे वस्त्र आहे. कापडाचे विविध प्रकार उपलब्ध आहेत, ज्यात सूत, लोकर, रेशीम, नायलॉन आणि पॉलिस्टर यांचा समावेश होतो. कापडाचा वापर वस्त्र, घरगुती वस्तू, औद्योगिक साहित्य आणि अनेक इतर उद्देशांसाठी केला जातो.

## हुशार ससा

ससा सावकाश आणि निवांतपणे सिंहाच्या घराकडे निघाला. तो सिंहापर्यंत पोहोचला तेव्हा खूप उशीर झाला होता. भुकेमुळे सिंहाला वाईट वाटत होते. एक छोटा ससा आपल्या दिशेने येताना पाहून तो संतापला आणि गर्जना करू लागला, तुला 'कोणी पाठवले आहे? पहिले, तू खूप छोटासा आहेस, दुसरे म्हणजे तू इतक्या उशिरा येत आहेस. ज्यांनी तुला पाठवले त्या सर्व मूर्खांना मी बघून घेईन. जर मी प्रत्येकाचे काम तमाम केले नाही तर माझे नाव देखील सिंह नाही.


लहान ससा जमिनीवर आदराने नतमस्तक झाला आणि म्हणाला, महाराज, जर तुम्ही माझे ऐकले तर तुम्ही मला किंवा इतर प्राण्यांना दोष देणार नाही. एक लहान ससा तुमच्या अन्नासाठी पुरेसा होणार नाही हे त्यांना माहीत होते, म्हणून त्यांनी सहा ससे पाठवले. पण वाटेत दुसरा सिंह भेटला. त्याने पाच ससे मारून खाल्ले.

हे ऐकून सिंह गर्जना करत म्हणाला, काय म्हणालास? दुसरा सिंह? तो कोण आहे ? तू त्याला कुठे पाहिलंस?

महाराज, तो खूप मोठा सिंह आहे, ससा म्हणाला, तो जमिनीच्या आतल्या एका मोठ्या गुहेतून बाहेर आला होता. तो मला मारणार होता. पण मी त्याला म्हणालो, 'सरकार, तुमच्यावर काय अन्याय झालाय हेच कळत नाही. आम्ही सर्व आमच्या आचार्याच्या जेवणासाठी जात होतो, पण तुम्ही त्याचे सर्व अन्न खाल्ले आहे. आमचा राजा अशा गोष्टी खपवून घेणार नाही. ते नक्कीच इथे येतील आणि तुला मारतील. त्यावर त्याने विचारले, 'तुझा राजा कोण?' मी उत्तर दिले, 'आमचा राजा जंगलातील सर्वात मोठा सिंह आहे.

महाराज मी हे बोलताच तो रागाने लाल झाला आणि म्हणाला, मूर्ख, मीच या जंगलाचा राजा आहे. इथले सगळे प्राणी माझे विषय आहेत. मी त्यांच्यासोबत मला पाहिजे ते करू शकतो. तू ज्याला तुझा राजा म्हणतोस त्या मूर्ख आणि चोर माझ्यासमोर हजर कर. खरा राजा कोण आहे ते मी त्याला सांगेन. एवढे बोलून सिंहाने मला इथे तुला आणायला पाठवले.

(क्रमशः)



## रहमते दर्शन (भाग - १)

मेरी जीवन शैली कुछ इस प्रकार की थी कि मुझे गुरुओं आदि में कोई विश्वास या आस्था नहीं थी, हालाँकि बड़े भाई साहब महाराज कृपालसिंह जी के सत्संग में जाया करते थे, परन्तु मेरे मन में कभी भी यह नहीं आया कि मैं संतों के दर्शन करूँ या सत्संग में जाऊँ। समय बीतता गया और एक दिन समाचार मिला कि संत कृपालसिंह जी महाराज चोला छोड़ गये हैं। मेरे लिए यह कोई विशेष घटना नहीं थी। इसके बाद यह सुनने में आया कि संत कृपालसिंह जी के स्थान पर संत दर्शनसिंह जी गद्दी पर बैठेंगे। मन में ये विरोध जागृत हुआ कि कैसे संत हैं कि बाप के बाद बेटे ने गद्दी सँभाली? वैसे मैं आँतों और अमाशय के रोग से पीड़ित था और अपनी शारीरिक स्थिति के बारे में बड़ा चिंतित रहता था। महाराज कृपालसिंह जी और संत दर्शनसिंह जी के फ़ोटो और कलेंडर ज़रूर मैंने भाई साहब के कमरे में देख रखे थे। एक बार

### अद्भुत अनुभव

का वाकिआ है कि मैं अपनी ख़राब सेहत के बारे में और अपने बच्चों के बारे में चिंता करता हुआ सो गया। कुछ देर लेटने के बाद करवटें बदलता रहा, लेकिन चिंता के कारण नींद नहीं आ रही थी। बातों-बातों में मैंने यह ज़रूर सुन रखा था कि संत पुरुष परमात्मा का रूप होते हैं और वे जो कुछ भी कह देते हैं वह सच हो जाता है। तो इसी तरह करवट बदलते हुए भोर हो गई। अचानक खुली आँखों से क्या देखता हूँ कि संत दर्शनसिंह जी महाराज एक छोटे रूप में आकर मेरे पेट पर खड़े हो गये और मुझसे बोले, तुम्हारा समय आ गया है, तैयार हो जाओ। मैं घबरा गया। मैंने अनायास ही महाराज जी के सामने हाथ जोड़ लिए और गिड़गिड़ाकर प्रार्थना करने लगा कि महाराज जी, मेरे बच्चे अभी छोटे हैं, आप कृपा कीजिए। भयवश थोड़ा सा विश्वास और श्रद्धा मेरे अन्दर जागृत हुआ। महाराज जी इतना कहकर अंतर्ध्यान हो गये। मैं हड़बड़ा कर उठा और भाई साहब के पास पहुँचा और सारी घटना का ब्यौरा दिया। एक बार तो भाई साहब भी चिंता में पड़ गये क्योंकि वे तो अच्छी तरह जानते थे कि गुरु अंतिम समय में ही लेने के लिए आता है, फिर भी मुझे सांत्वना देते हुए बोले, चिंता मत करो, महाराज जी से प्रार्थना करेंगे।

शाम को हम दोनों भाई कृपाल आश्रम में पहुँचे। पता चला कि महाराज जी संगत को दर्शन दे चुके हैं और अपने निवास की तरफ़ जा रहे हैं। हम दोनों भाई शीघ्रता से आगे बढ़े और महाराज जी को उनके निवास की सीढ़ियों पर चढ़ते देखा। हमने पुकार की। महाराज जी ने हमारी तरफ़ देखा। भाई साहब ने आगे बढ़कर और नतमस्तक होकर हुज़ूर से प्रार्थना की, महाराज जी ये मेरा छोटा भाई है और इसे आज प्रातःकाल ये दृश्य दिखाई दिया है। महाराज जी! अभी इसके बच्चे छोटे हैं, आप इस पर दया कीजिये और इसे जीवनदान दीजिये।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

शिला है, जिसे आप से शुरू होना चाहिए। इस विश्वास को आस पास के व्यापक जगत तक फैलाना जारी रखें। हमें ऐसे संदेश और कहानियां बार बार देखने या पढ़ने को मिलती हैं, जो हमारे मन में व्याप्त डर को बलवान करती हैं। कुछ ऐसे डर अंदर आ जाते हैं, जिन के बारे आपने कभी सोचा भी न था। मीडिया बुरी और नकारात्मक चीजे खोजने पर केंद्रित रहता है। मीडिया हिंसक कार्य और घटनाए बताता है। अच्छे तथा सकारात्मक मुद्दों और घटनाओ को छोड़ दिया जाता है। हम मन ही मन डरते रहते हैं कि बाहर की दुनिया भयंकर, बुरी और खतरनाक है। सदा याद रखो कि जीवन चल सकता है, समस्याए सुलझाई जा सकती हैं और त्रासद घटनाओ से उबरा जा सकता है। फिल्में और टी. वी. शो भी मानव स्वभाव के नकारात्मक पहलू को उजागर करते हैं। इस से नकारात्मक और डरने वाले दृष्टिकोण को बल मिलता है। हम नकारात्मक सन्देशों की बाढ़ में डूबे हुए हैं। हम अपने पड़ोसियों से, अपने शहर और समाज से तथा पूरे संसार से डरे हुए हैं। हम दूसरे लोगों, दूसरे देशों, दूसरे धर्म के लोगों से डरे हुए हैं। एक दूसरे पर अविश्वास हो तो समाज का ढांचा खुद बखुद गिरने लगता है। इस

### दिमाग की शक्ती

की वजह एक दूसरे से दूर चले जाते हैं। विश्वास एक ऊर्जा है जो आप को सही दिशा में चलाती है। विश्वास तो रखें परंतु तर्क से परख भी लें। जिस से भी वास्ता जब विश्वास अंधा हो जाता है तो यह मर जाता पड़े, उस से निबटने के लिये, उस समस्या या संबन्ध के बारे पुस्तकें पढ़ें। विश्वास वह गोंद है जो मानव समाज को एक साथ बांधे रखती है। विश्वास की कमी संसार को नष्ट करने के करीब ले आई है। अगर अविश्वास आप पर हावी हो गया है तो यह आप के सपने नष्ट कर देगा। विश्वास परमजीत है और जीत की स्थिति है।

आज हमारा संसार सभी स्तरों पर प्रलय की भविष्यवाणियों, नकारात्मक लोगों और अभूतपूर्व आलोचनाओं से भरा है। संसार और इसकी शक्तियां हमारे नियन्त्रण में नहीं हैं और न ही पूरी तरह से नियन्त्रण में आ सकती हैं। विश्वास हमें जीवन का दैनिक संघर्ष जारी रखने की शक्ति देता है। यह हमें हर दिन से गुजार कर अगले दिन की ओर ले जाता है। विश्वास हमें भविष्य के लिये योजनाएं बनाने की क्षमता देता है। यह विश्वास ही है कि सूर्य अगली सुबह उगेगा, मौसम जारी रहेंगे, पृथ्वी और वर्षा उसकी फसल को पोषण देगी तथा जिंदगी उसी तरह चलती रहेगी जैसे अतीत में चलती रही है। मानव समाज विश्वास पर आधारित है। सहयोग से काम करने के कारण सभ्यता फली फूली है। संसार में हर व्यक्ति पर विश्वास करते हुए अपनी भूमिका निभाता है कि हर दूसरा व्यक्ति भी ऐसा ही करेगा ताकि समाज की सारी चीजे पूरी हो जाएं। हम विश्वास करते हैं कि समाज और इसके सारे तंत्र सब की भलाई के लिये काम करते हैं। समाज और इसकी संस्थाओ पर आज प्रश्नचिन्ह लग चुका है। वर्तमान युग में विश्वास करना चुनौतीपूर्ण है। वर्तमान समाज विश्वास और सम्मान की स्थिति से लुढ़क कर शक व अनादर की निराशाजनक स्थिति में पहुंच गया है। नेता व संस्थाएं जो हमारे टैक्स का पैसा खर्च करते हैं, भ्रष्टाचार में लिप्त हैं। हमारा विश्वास आतंक और हिंसा की वजह से उठ चुका है। दुनिया पहले से ज्यादा डरावनी बनती जा रही है। पूरे संसार में अविश्वास और तनाव बना हुआ है। इस चुनौतीपूर्ण समय में विश्वास की जरूरत है।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

त्यामुळे जेवलेल्या अन्नाचे नीट पचन होत नाही. त्या कारणाने पोट गच्च होणे, पोटात गुब्बारा धरणे, छातीत जळजळ ही लक्षणे जाणवतात.

**उपाययोजना :** हा त्रास होऊ नये म्हणून जास्त मसालेदार पदार्थ, मांसाहारी पदार्थ खाऊ नयेत व थंड दूध प्यावे. गायीचे शुद्ध तूप जेवणात घ्यावे.

**आयुर्वेदिक औषधी उपाययोजना :** आवळा सरबत, मोरावळा, दुर्वांकुर च्यवनप्राश तसेच जेवणानंतर आमपाचक वटी घ्यावी. अविपत्तिकर चूर्ण १-१ चमचा शहाळ्याच्या पाण्यासोबत किंवा साध्या पाण्यासोबत घ्यावे. तसेच पित्ताचा जास्त त्रास होत असल्यास सुवर्णशेखर रस, कापदुधवटी यांचा वापर करावा. शहाळ्याचे पाणी सकाळी १ ग्लास व संध्याकाळी १ ग्लास घेतले तरी पित्ताची लक्षणे कमी होतात. एवढे करूनही त्रास असल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधोपचार घ्यावेत.

**३. मलावस्तंभ** (Constipation) : गर्भावस्थे मध्ये मलाशयावर गर्भाशयाचा दाब पडल्याने

### गर्भावस्थेतील आजार व उपचार

मलावस्तंभाचा त्रास बऱ्याच गर्भवतींना जाणवतो. त्याच प्रमाणे गर्भावस्थेत शारीरिक हालचाल कमी होते. गर्भवतीचे शरीरातील हॉर्मोन्सचे प्रमाण कमी-जास्त होत असते. तसेच गर्भावस्थेत घेत असलेल्या रक्तवाढीच्या औषधांमुळे सदा मलावस्तंभाचा त्रास होत असतो. एवढे करूनही मलावस्तंभाचा त्रास होत असेल, तर रात्री झोपताना एक चमचा त्रिफळाचूर्ण ज्येष्ठमधासोबत कोमट पाण्यातून घ्यावे.

**उपाययोजना :** भरपूर फळे, पालेभाज्या, मोड आलेली कडधान्ये, गाजर, टोमॅटो, काकडी यांचे सॅलेड खावे, कारण यांमध्ये फायबरयुक्त म्हणजेच चोथा असणारे घटक भरपूर असतात त्यामुळे पोट साफ राहण्यास मदत होते. दिवसभरात भरपूर पाणी प्यावे. रात्री झोपताना १ ग्लासभर गायीच्या दूधात गायीचे तूप टाकून प्यावे.

**आयुर्वेदिक औषधी उपाययोजना :** जर रक्तवाढीच्या औषधांमुळे मलावस्तंभाचा त्रास होत असेल, तर रक्तवाढीच्या आयुर्वेदिक औषधांचा वापर करावा. रात्री झोपताना दोन खारीक, २-३ चमचे गुलकंद, १०-१२ काळे मनुके भिजत घालावेत व सकाळी उठून प्रथम ते खावे; यामुळे पोट देखील साफ होते व रक्तचेही प्रमाण वाढते.

**४) पाठदुखी व कंबरदुखी :** गर्भावस्थेत पाठीच्या मणक्यांवर गर्भाशयाचा ताण पडल्याने, गर्भावस्थेत स्नायू शिथिल झाल्याने पाठीचा व कंबरदुखीचा त्रास जाणवतो. तसेच कॅल्शियमच्या कमतरतेमुळे देखील पाठदुखीचा त्रास जाणवतो.

**उपाययोजना :**

१) गादीवर न झोपता सपाट भागावर झोपावे. उदा. चटई, सतरंजी.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# लाडक्या योजनांचे लाडके वर्ष २०२४ दिसं येतील..दिसं जातील..

घडामोडी हा शब्द मराठीत किती अर्थपूर्ण आहे. जगात प्रत्येक क्षणाला काहीतरी घडत असतं आणि काहीतरी मोडत असतं., ते घडवणारे पण आपणच.. मोडणारे पण आपणच.. त्या अर्थाने मागचे वर्ष म्हणजे आपण बरेच काही चांगलं घडवलं आणि बरेच काही चांगलं मोडलं देखील... सर्वात गंभीर गोष्ट म्हणजे काहीही न करता फुकट काय मिळते? याच्याकडे प्राधान्य आपण देऊ लागलो, तेच सरकारने ओळखले आणि फुकट योजनांचं २०२४ मध्ये धरण फुटलं., आणि काही काम करण्याची इच्छाशक्ती, ध्येय, जिद्द, क्रयशक्ती हे शब्द त्या पुरात वाहून गेले. माणसं निष्क्रिय बनवली, कष्टाने मिळतं त्याला फळ म्हणतात, आयतं मिळतं ते निष्फळ आणि सरकारने अजून एक फुकट फळ दिले ते म्हणजे मुक्ताफळ..!

या कालचक्रामध्ये दरवर्षी भिंतीवरच जुनं कॅलेंडर काढुन टाकतांना आणि त्याच खिळ्यावर नवीन टांगतांना, ते काम आपण किती अलिप्तपणे आणि सहज करत असतो...ती संपलेली महिन्यांची पानं अन् ते तारखांचे चौकोन आपण खरंच जगलो कि नाही याचा विचारही मनात येत नाही, कॅलेंडर बदलतांना आपल्या आयुष्याचा जगलेला आणि न जगलेला एक मोठा अध्याय आपण बदलतो आहोत, याची आपल्याला जाणीव होत नाही.

घरात बसून निव्वळ भिंतीकडे पहात जगणाऱ्यांची संख्या जगात फार मोठी आहे, त्यांना त्या भिंतीवर कोणत्याही वर्षाचे, कुठल्याही रंगांच्या तारखांचे चौकोन असलेले कुठलेही कॅलेंडर असले तरी काही फरक पडत नाही. कारण त्यांचं आयुष्य व्हेंटिलेटरवरच्या पेशंटसारखं झालेलं असतं. श्वास चालू आहेत म्हणून जिवंत आहेत म्हणायचं.. आपणही हतबलपणे प्रवाहपतित होऊन आणि त्या प्रवाहाचाच एक हिस्सा होऊन पाहत राहिलो आहोत. विचार करण्यासाठी आपण कोणाजवळच वेळ नाही. वास्तविक वेळ हि कधीच कमी वा जास्त नसते, घड्याळ घड्याळाच्याच वेगाने चालत असते.

प्रश्न असतो जगण्यासाठी प्राधान्यक्रमाचा.. अन् तिथेच सगळी फसगत होते आहे. ज्या जीवनासाठी सगळी तडजोड आहे, ते जीवनच जर मूल्यवान आणि महत्त्वाचं वाटत नसेल तर काय उपयोग? मग प्राधान्य कशाला द्यायचं? आपण बोलताना सहज शब्द प्रयोग करून जातो की जगाने खूप वेग घेतला आहे. वास्तविक हे मत धादांत चुकीचे आहे.. कारण या पृथ्वीच्या जन्मापासून ती बिचारी त्याच साडेबावीस अंशामध्ये आणि २४ तासांच्या त्याच वेगाने स्वतः भोवती आणि सूर्याभोवती फिरते आहे. तेच दिवस तेच रात्र दिनमान, त्याच वेगाने सुर्य, चंद्र, तारे.. तेच ऋतु.. भरती ओहोटी.. त्यामध्ये लाखो वर्षांमध्ये काहीही.. मिनिटांचा देखील फरक झालेला नाही, त्यामुळे अर्थातच शेकडो वर्षापासून घड्याळे देखील त्याच वेगाने एका मिनिटाचाही इकडे तिकडे फरक न करता चालूच आहेत.. मग जगाने खूप वेग घेतला आहे, असं म्हणणं चुकीचंच नाही का? कारण जगाने नव्हे तर या जगामध्ये मी फार बुध्दीमान आहे, असं समजून जगणाराने वेग घेतला आहे.. त्यामधेही विशेष म्हणजे माणूस सोडून इतर कुठल्याही सजीवाने या वेगापुढे लोटांगण घातलेले नाही... यामधे नेमके खरे बुध्दीमान (?) कोण हा संशोधनाचा विषय आहे.




हे जग, पृथ्वी, हे ब्रम्हांड त्यांच्या त्याच अब्जावधी वर्षापूर्वी ठरलेल्या शिस्तबद्ध वेगानेच चालत आले आहे. पण वेग यालाच आपण प्रगती समजून बसलो आहोत.

वेग म्हणजे प्रगती नव्हे, गती म्हणजे उन्नती नव्हे.. आपली उन्नती होते आहे की अधोगती?.. आपण वरती चाललो आहोत की खाली खोल दरीमध्ये?.. याची गतीला कधीच पर्वा नसते आणि जाणीव देखील नसते. म्हणून तर गतीपेक्षा जास्त दिशेला महत्त्व आहे. पण दिशा कळायला आपण शुध्दीत असणे आवश्यक आहे. या आधुनिक कार्पोरेट जगामध्ये थोड्या वेळा मध्ये, जास्तीत जास्त गोष्टींचा आटापिटा साध्य करण्याची 'टाईम मॅनेजमेंट' ची दांडगी कला आत्मसात करणे, हि जरी कौतुकाची गोष्ट ठरत असली तरी, आपण 'मॅनेज' करत असलेला तोच 'टाइम' जर आपल्यालाच सोडून फार पुढे निघून जात असेल, आणि त्या नादात आपलंच जीवन जगणं मागे राहून जात असेल, तर त्या वेगाचा काय उपयोग? जिंदगी भर जिंदा रहा, मगर जिंदगी नहीं देखी?? अशी सर्वांची आज अवस्था आहे.

आजच्या या स्पर्धेच्या युगामध्ये दुसऱ्याला मागे टाकण्याच्या कर्तृत्वाऐवजी सर्वात आधी आपण स्वतःलाच गाठणं शिकलं पाहिजे, स्वतःलाच गाठणं यासारखी दुसरी प्रगती नाही.

आठशे वर्षांपूर्वी ज्ञानेश्वर म्हणाले की.. अरे अरे ज्ञाना झालासी पावन.. तुझे तुज ध्यान कळो आले... तुझा तुझी भाव, तुझा तुच देव.. फिटला संदेह अन्य तत्वे... हे आपलंच ध्यान आपल्यालाच पूर्ण अर्थाने समजण्यासारखी दुसरी आयुष्यात क्रांती नाही. या जीवघेण्या स्पर्धेच्या बेहोष नादात यश नावाच्या शिडीचं रूपांतर एक दिवस तिरडीमध्ये व्हायला काहीच वेळ लागत नसतो.

मग त्यावेळेस वाटतं की अरे माझं तर जगायचंच राहून गेलं.. या मानवजातीने घड्याळ आपल्या हातात बांधले आहे? की त्या घड्याळ्याच्या काट्याला स्वतःला बांधून घेतले आहे?

इतका प्रवाहपतितपणा आपल्याला खरच सर्वांगिण उन्नतीकडेच घेऊन जाईल का? पतंग वाऱ्याबरोबर उडत नसतो तर वाऱ्याला विरोध केल्यामुळे वर वर जात असतो. ज्या क्षणाला पतंगाचा वाऱ्याला करत असलेला विरोध संपतो, त्या क्षणाला तो पतंग वाऱ्याला शरण जातो.. तेव्हा त्याचे वेगाने दिशाहीन भरकटणे सुरू होते.. त्या अवस्थेलाच कटी पतंग म्हणतात. आज आधुनिक तंत्रज्ञानाच्या आकाशात सगळीकडे असेच आकर्षक रंगीबेरंगी कटी पतंग दिसत आहेत. आणि हे दृश्य काही, चांगले नाही.

इथे या आधुनिक आणि वेगवान युगाचे नकारात्मकच पैलु सांगायचे असा हेतु नाही किंवा या आधुनिक युगात जगतांना आपण मुद्दाम वेगळं, संथच जगायचं..असाही याचा अर्थ नाही.. यामधे जीवनात कशाला प्राधान्यक्रम द्यायचा, हे निश्चित ठरवणे हाच रामबाण उपाय आहे. मग नेमकं जगायचं कसं.. एक शायर म्हणतो..

समझ नही आते जिंदगी तेरे फैसले कभी कभी.. एक तरफ तू कहती है, के सब्र का फल मीठा होता है.. और दुसरी तरफ कहती है.. के वक्त किसी का इंतजार नही करता...

हा जो वक्त आहे तो बेहोशीतच संपवायचा की शांत समजून उमजून समाधानी जगायचा, हे मात्र आपल्याच हातात आहे.

आज कुठल्याही एक्सप्रेस हायवे वर कधीतरी मुद्दाम पाच मिनिटे गाडी बाजूला घेऊन शांतपणे त्या एक्सप्रेस हायवेवरून जाणाऱ्या येणाऱ्या वाहतुकीचे जर अलिप्तपणे, थंड डोक्याने निरीक्षण करून पहा..., तुफान वाऱ्याच्या वेगाने माणसं पळत आहेत, सुं..सुं करत गाड्या पळवणारी माणसं एकमेकांशी जीवघेणी स्पर्धा करत तुफान वेगाने दिसेनाशी होत आहेत, त्यांना वेळ वाचवायचा आहे, सर्वांनाच सर्वांच्या अगोदर पोहचायचे आहे.. का ? व कुठे पोहोचायचे आहे ते कुणास ठाऊक? एवढी जीवघेणी घाई कशाची आहे आणि तो वेळ वाचवून त्या वाचलेल्या वेळेचं नंतर हे नेमकं करतात काय? कशासाठी इतकी प्रचंड अस्वस्थता? नेमकी कशाची घाई आहे? या बेहोशीत पळणारांचा नेमका विश्वास जीवनावर आहे की मृत्यूवर आहे? हा कुठला बेहोश वेग आपण धारण केला आहे. एकट्या आपल्या देशात दररोज ४७४ आणि जगात ३००० लोक दररोज रस्त्यावरच्या अपघातात मरण पावतात. हे प्रमाण कुठल्या महायुद्धापेक्षा भयानक आहे.

माणसं जागेपणी देखील झोपेतच असल्यासारखी दिशाहीन ठेचकाळत, चाचपडत पळत आहेत.. आणि झोपेत देखील जागीच असल्यासारखी अस्वस्थ चाळवत आहेत.. यंत्रवत निर्जीव संवेदना शून्य...

आहार, निद्रा, भय, आणि मैथुन या चार गोष्टी जे प्रत्येक जनावर देखील करतं तेच आपणही करत आहोत.. मेंदू नाही, आपुलकी नाही, भावना नाही.. त्यात भर म्हणजे आता आर्टिफिशियल इंटेलिजन्स नावाचा भस्मासुर आलेला आहे. स्वतःच्या डोक्यावर हात ठेवून मेंदू नावाचा प्रकार भस्म करून टाकला. किरकोळ ५० रुपयाचा हिशोब करण्यासाठी सुद्धा तथाकथित उच्चशिक्षित लोकांना कॅल्क्युलेटर कडेच मदतीची भीक मागावी लागते. कुठे आहे आपला मेंदू? एकंदर फक्त ओंजळभर पोटाची खळगी भरण्यासाठी करोडो रुपये गाड्या बंगले मिळवायचे म्हणून असे जगत आहोत की, जणू कधी मरणारच नाहीत.. आणि.. मग त्याच्या मागे पळता पळता अचानक एक दिवस असे मरत आहोत की, जणू कधी जगलोच नाहीत. अशा बँकेत पैसे जमा करत आहोत, किती बँकच अस्तित्वात नाही.

आधुनिक सुविधांच्या आणि उपकरणांच्या नावाखाली स्वतःचाच मेंदू स्वतःच नष्ट करून करून दिवसां गणिक वाढत चाललेल्या अदृश्य अशा सर्वच्या सर्व बाबतीत परावलंबी होण्याच्या जीव घेण्या स्पर्धेमध्ये या कलियुगा मधलं मानव जातीचं महाकाय टायटॅनिक जहाज बुडत चाललं आहे. प्राधान्यक्रम नावाच्या छोट्या बोटीवर जो सवार होईल तोच या मायाजाळी समुद्रातून पार होईल. **– सुहासभाई मुळे (९८२३७२२२१२)**

## नववर्षाच्या स्वागतासाठी फटाक्यांची आतषबाजी नकोच

फटाके आणि हानी यांचे समीकरण ठरलेले असताना भारतात फटाक्यांना इतके का महत्व दिले जात आहे हे न उलगडणारे कोडे आहे. दूषित हवा आणि वाढलेले प्रदूषण यांचे डोक्यावर सावट असतानाही यंदा दिवाळीत प्रचंड प्रमाणात फटाके फोडले गेले. परिणामी अनेक ठिकाणी आगी लागण्याच्या घटना घडल्या, श्वसन विकार असणाऱ्यांना, वृद्धांना, गर्भवती महिलांना, मुक्या प्राण्यांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागला. यातून लहान मुले आणि तरूणही सुटले नाहीत. न्यायालयाने दिवाळीत फटाके फोडण्याला वेळेचे बंधन घालून दिले असताना त्याची अंमलबजावणी केवळ कागदावरच राहिली. नववर्षाच्या स्वागतार्थ ३१ डिसेंबरच्या रात्री दरवर्षी देशभरात मोठ्या प्रमाणात फटाके फोडले जातात. शहरासारख्या ठिकाणी हे प्रमाण खूपच असते. मोठ्या आवाजासह धूर निर्माण करणारे फटाकेही या रात्री प्रचंड प्रमाणात फोडले जातात. धनिप्रदूषणासह वायू प्रदूषणात भर घालणाऱ्या या आतषबाजीवर सरकारकडून अथवा न्यायालयाकडून निर्बंध का घातले जात नाहीत हाही एक प्रश्नच आहे. भारतीय संस्कृतीचा भाग नसलेल्या फटाक्यांचा आतषबाजीला भारतात नको तेव्हढे महत्व दिले जाते. लग्न समारंभ, मिरवणूका, राजकीय सभा, यात्रा, वाढदिवस, खेळांच्या स्पर्धा, निवडणूका यांसारख्या प्रसंगी सर्रासपणे फटाके फोडले जातात. फटाक्यांच्या आवाजामुळे आणि धुरामुळे सामान्य नागरिकांसह पशु-पक्षांनाही त्रास सहन करावा लागतो. गर्भवती स्त्रिया, लहान मुले, रुग्णाईत यांना या आतषबाजीचा अधिक त्रास सहन करावा लागतो. याशिवाय फटाके बनवणाऱ्या कारखान्यांमध्ये आणि गोदामांमध्ये वर्षभर कुठेना कुठे आगी लागून जीवित आणि वित्त हानीच्या घटना घडल्याचे वृत्त वाचनात येते. नवीन वर्षात तरी सरकार याबाबत गांभीर्याने विचार करणार आहे का ?

## ईश्वर जामगांवकर यांनी सायकलवर १० दिवसात पूर्ण केला पुणे ते अयोध्या प्रवास



नगर – इंडो अ‍ॅथलेटिक्स सोसायटीचा पुणे यांच्यातर्फे पुणे ते अयोध्या सायकल प्रवास १५५० किलो मिटर ईश्वर अशोक जामगांवर याने १० दिवसात पुर्ण केले. याच्या आधी सुद्धा तो पुणे ते गिरणार, बंगलोर, पंढरपूर या ठिकाणी सायकल प्रवार केला.

इंडो अ‍ॅथलेटिक्स सोसायटीने पुणे ते कन्याकुमारी, गोवा, हंपी आणि सोमनाथ या सहलींचे आयोजन केले होते. पादचारी सायकलिंग संघटनेचे सरचिटणीस डॉ. आनंद किशोर पांडे यांनी लखनौच्या चौकातून १०० सायकलस्वारांना हिरवा झेंडा दाखवून अयोध्येकडे रवाना केले. पर्यावरण रक्षण, हिरवाईचा संवर्धन आणि समृद्धीचा संदेश लोकांपर्यंत पोहोचवणे हा या यात्रेचा उद्देश आहे.

हा सायकल प्रवास पुणे, शिर्डी, उज्जैन, महेश्वर, झाशी आणि लखनौ अशा अनेक ऐतिहासिक आणि सांस्कृतिक स्थळांचा समावेश करण्यात आला होते. पहिल्या दिवशी पुण्याहून शिर्डी, दुसऱ्या दिवशी शिर्डी ते शिरपूर, शिरपूर ते महेश्वर, महेश्वर ते उज्जैन, उज्जैन ते बिओरा, बिओरा ते बदरवास, बदरवास ते झाशी, झाशी ते कानपूर, कानपूर ते लखनौ अशी ही यात्रा लखनौ ते अयोध्या संपन्न झाली.

यावेळी प्रवास करत असताना त्याचे अनेक ठिकाणी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.



विनायकराज प्रतिष्ठाण च्या वतीने दिनदर्शिका २०२५ चे अनावरण माळीवाडा येथील विशाल गणेश मंदिरात महंत संगमनाथ महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी अध्यक्ष विपुल वाखुरे उपाध्यक्ष विनय वाखुरे सर्व सदस्य, कार्यकर्त, उपस्थित होते. (छाया – विजय मते)

## विनायकराज प्रतिष्ठाणचे कार्य कौतुकास्पद : महंत संगमनाथ

नगर – समाज कार्य करताना आपण केलेले काम हे लोकांना उपयोगी असे असावे या उद्देशाने वाखुरे बंधू यांनी लोकांचे ज्वलंत प्रश्न सोडविण्यासाठी स्वतः पुढाकार घेऊन विनायकराज प्रतिष्ठाण च्या माध्यमातून अनेक कामे केली त्यांचे कार्य कौतुकास्पद असे आहे असे प्रतिपादन माळीवाडा येथील विशाल गणेश मंदिराचे महंत संगमनाथ महाराज यांनी केले.


विनायकराजं प्रतिष्ठाण चे अध्यक्ष विपुल कल्याण वाखुरे, उपाध्यक्ष विनय कल्याण वाखुरे या बंधूंच्या दिनदर्शिका २०२५ चे शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणपती चरणी अनावरण करण्यात आले. या वर्षीच्या दिनदर्शिका मधे प्रेरणा दायी सुविचार, निसर्ग चित्रे व शहरासाठी व प्रभागासाठी केलेली सामाजिक कामे या मार्फत लोकांपर्यन्त पोहचवण्याचा प्रयत्न करण्यात आला. हा एक स्तुत्य उपक्रम आहे, असे संगमनाथ महाराज म्हणाले.

या दिनदर्शिकाच्या २०२५ अनावरण प्रसंगी मंदिराचे महंत संगमनाथ महाराज, मोहटा देवी संस्थानचे विश्वस्त अ‍ॅड. विक्रम वाडेकर, बांधकाम व्यावसायिक प्रदिप वाखुरे, सचिन निक्रड, उद्योजक अभिजित खरपुडे, क्सिस बँकेचे ब्रँच मॅनेजर महेश डोखे, रुपेश कपिले, मयुर कुलकर्णी, प्रणव गांधी, अनिल लगड, सागर ठाकुर, मृगांक मुळे, शंतनु कुलकर्णी, अतुल देव्हारे, यश शहा, सुरज लोखंडे, सार्थक लोहार, संदिप चौधरी, अजय रासकर, ओम काळे, गौरव परदेशी, अंकित छोत्रे, प्रतिष्ठाणचे सदस्य, मित्र परिवार उपस्थित होते.

## कवयित्री सरोज आल्हाट यांच्या इंग्रजी काव्यसंग्रहास पुरस्कार

### इंप्रिंट्स ऑफ नेचर अ‍ॅण्ड माय सोल काव्य संग्रहाला सरोजनी नायडू उत्कृष्ट काव्य पुरस्कार जाहीर





नगर – येथील कवयित्री सरोज आल्हाट यांच्या इंप्रिंट्स ऑफ नेचर अ‍ॅण्ड माय सोल या इंग्रजी काव्यसंग्रहास धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने कवयित्री सरोजनी नायडू उत्कृष्ट काव्य पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. निमगाव वाघा (ता. नगर) येथे स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय युवा सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर १२ जानेवारी रोजी होणाऱ्या सातव्या काव्य संमेलनात आल्हाट यांना सदर पुरस्काराने सन्मानित केले जाणार असल्याची माहिती वाचनालयाचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे व सचिव मंदा डोंगरे यांनी दिली.

या कार्यक्रमास स्वागताध्यक्ष खासदार निलेश लंके, साहित्यिक ज्ञानदेव पांडुळे, जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी (योजना) बाळासाहेब बुगे, मराठा समन्वय परिषदेच्या राज्य कार्याध्यक्षा अनिता काळे, ज्येष्ठ कवी चंद्रकांत पालवे, कवी गिताराम नरवडे, गझलकार रज्ञाक शेख, माजी सेवानिवृत्त पोलीस अधिकारी सुभाष सोनवणे, कवी आनंदा साळवे आदी उपस्थित राहणार आहेत.

सरोज आल्हाट या मराठी काव्य संग्रहाबरोबरच इंग्रजी काव्यसंग्रह लिहिणाऱ्या जिल्ह्यातील पहिल्या कवयित्री आहेत. त्या गेल्या ३० वर्षांपासून संपूर्ण महाराष्ट्रात सामाजिक, साहित्यिक व पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असून, अनेक महत्त्वाची पदे सांभाळतानाच, असंख्य इंग्रजी व मराठी मासिकांचे संपादन तसेच त्यांचे लिखाणही प्रसिद्ध झाले आहे. त्यांना अनेक प्रतिष्ठित राज्य व राष्ट्रीय पातळीवरील पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. त्यांच्या चार मराठी काव्यसंग्रहांप्रमाणेच इंग्रजी काव्यसंग्रहातील कविता ही तुल्यबळ, अत्यंत दर्जेदार आहे. या काव्य संग्रहाची दखल घेऊन आल्हाट यांच्या इंप्रिंट्स ऑफ नेचर अ‍ॅण्ड माय सोल या इंग्रजी काव्यसंग्रहास कवयित्री सरोजनी नायडू उत्कृष्ट काव्य पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

## धार्मिक कार्यक्रमाबाबत जर फ्लेक्स असतील तर त्यांना परवानगीची बंधने आणू नका



श्रीनिवास बोज्ञा

नगर – फ्लेक्समुक्त अहिल्यानगर अभियान राबविण्याचा निर्णय महापालिकेचे आयुक्त यांनी नुकताच घेतला आहे. परंतु धार्मिक कार्यक्रमाबाबत जर फ्लेक्स असतील तर त्यांना परवानगीची बंधने आणू नका असे आवाहन श्रीनिवास बोज्ञा यांनी केले आहे.

आयुक्त यांचा निर्णय नगर शहराच्या सुशोभीकरणाचे दृष्टीने योग्यच आहे कारण नगर शहरामध्ये असा कोणताही चौक नाही की ज्या चौकात फ्लेक्स लावलेले नाहीत, अनेक ठिकाणी फ्लेक्स अश्या अडचणीत लावलेले असतात की त्यामुळे लहान मोठे अपघातही घडलेले आहेत सदर फ्लेक्स कोणी सामान्य नागरिक हालवण्याचा प्रयत्न केला तर त्याला मारहाण झाल्याची उदाहरणे आहे. यामुळे या पुढे फ्लेक्स लावण्यासाठी महानगरपालिकेची परवानगी तर आवश्यक आहेच पण फ्लेक्स प्रिंटिंग करणाऱ्यांनी सुद्धा परवानगी असल्याशिवाय प्रिंटिंग करू नये म्हणजे फ्लेक्स लावण्याचा प्रश्नच उद्‌भवणार नाही. आयुक्तांनी जो निर्णय घेतला यामध्ये फ्लेक्स लावायचे असेल तर त्यांना परवानगी शुल्क आकारून ऑनलाईन व सुलभ पद्धतीने परवानगी द्यावी त्यासाठी फ्लेक्स लावणाऱ्यांना हेलपाटे घालण्याची वेळ येऊ नये अशीही मागणी बोज्ञा यांनी केली. तसेच सदर फ्लेक्समुक्त अहिल्यानगर अभियान ही आयुक्त यांनी काटेकोर पाळावे यामध्ये कोणालाही सूट देऊ नये अगर कोणत्याही राजकीय दबावाला बळी पडू नये असेही आवाहन बोज्ञा यांनी केले आहे.

## 'अहमदनगर मर्चंटस बँक' आयोजित 'एएमसी कप २०२४ क्रिकेट' स्पर्धेत पुरुषांच्या 'रिकव्हरी चॅलेंजर्स'ला तर महिलांच्या 'टिडीएस वुमेन्स'ला विजेतेपद

नगर – अहमदनगर मर्चंटस को ऑप बँकेच्यावतीने कर्मचाऱ्यांसाठी आयोजित एएमसी कप २०२४ क्रिकेट' स्पर्धेत पुरुषांमध्ये 'रिकव्हरी चॅलेंजर्स' तर महिलांमध्ये 'टिडीएस वुमेन्स'ला विजेतेपद मिळाले. वुमन ऑफ दि सिरीज पुरस्कार कोमल गांधी तर मॅन ऑफ दि सिरीज पुरस्कार अनिकेत शिंदे यांनी मिळवला. समारंभात स्पर्धेचे बक्षीस वितरण कार्यक्रम झाला.



अहमदनगर मर्चंटस बँक आयोजित 'एएमसी कप २०२४ क्रिकेट' स्पर्धेत पुरुषांमध्ये 'रिकव्हरी चॅलेंजर्स' तर महिलांमध्ये 'टिडीएस वुमेन्स'ने विजेतेपद पटकाविले.

सकाळी बुरूडगाव रोड वरील साईनगर टर्फ क्लबवर स्पर्धेचे उद्‌घाटन बँकेचे संस्थापक चेअरमन हस्तीमल मुनोत यांच्या हस्ते आकाशात फुगे सोडून करण्यात आले. याप्रसंगी बँकेचे व्हा. चेअरमन अमित मुथा, संचालक संजय बोरा, किशोर मुनोत, संजय चोपडा, विजय कोथिंबीरे, बोर्ड ऑफ मॅनेजमेंट सदस्य राजेश झंवर, पेमराज बोथरा, कर्मचारी संचालक प्रसाद गांधी, जॉईंट सीईओ नितीन भंडारी व सर्व कर्मचारी उपस्थित होते.

हस्तीमल मुनोत म्हणाले, दररोजचे काम अधिक कार्यक्षमतेने करण्यासाठी शारीरिक आणि मानसिक आरोग्य उत्तम असणे गरजेचे असते. त्यासाठी मैदानी खेळ, नियमित व्यायाम महत्त्वाचा आहे. मर्चंट बँकेने क्रिकेट स्पर्धा आयोजित करताना सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांना सहभागी करून घेत त्यांना खेळाचा निखळ आनंद मिळवून दिला आहे. कर्मचारी आनंदी, सकारात्मक असतील तर बँकेचे कामकाज अधिक प्रभावीपणे करू शकतील. सतत कार्यक्षम आणि आनंदी राहण्यासाठी प्रत्येकाने खेळ आणि व्यायामाला दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवावे असे आवाहन त्यांनी केले.

अमित मुथा यांनी प्रास्ताविक करताना सांगितले की, कोणत्याही मोठ्या संस्थेत एकीचे बळ महत्त्वाचे असते. या स्पर्धेनिमित्त अधिकारी, कर्मचारी आपापल्या संघातून एकत्र खेळत आहेत. यातून संघभावना, खिलाडूवृत्ती तयार होण्यास मदत होते. बँकेत काम करतानाही अशीच सांघिक भावना ठेवून प्रत्येकाने एकमेकांना सहकार्य करून स्वतःची आणि बँकेची प्रगती साधली पाहिजे. हस्तीमल मुनोत यांच्या प्रोत्साहनातून आयोजित ही स्पर्धा सर्वांचाच उत्साह वाढवणारी आहे. या स्पर्धेत १२१ पुरुष तर २८ महिलांनी सहभाग नोंदवला. पुरुषांचे डिपॉझिट वारियर्स, रिकव्हरी चॅलेंजर्स, ऑडिट किंग, आयटी बॉईज, कॅश रायडर्स, एचपी फायटर्स, सीटीएस टायगर्स, करंट बॉईज, सेव्हिंग्ज ११, आरटीजीएस रॉयल्स, फ्रँकिंग ब्लास्टर्स, विद्याश्री टिम व महिलांचे लॉकर गर्ल्स, टिडीएस वुमेन्स, स्वामिनी क्वीन्स, इन्व्हेस्टमेंट वुमेन या संघांनी सहभाग घेतला.

संजय चोपडा म्हणाले, मर्चंटस बँकेने नेहमीच कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देणारे उपक्रम राबविले आहेत. आताच्या क्रिकेट स्पर्धेत सर्वच सामने अतिशय चुरशीने झाल्याने उपस्थित सर्वांनीच खेळाडूंना दाद दिली. अशा स्पर्धांमुळे परस्पर स्नेह वृद्धिंगत होतो.

सर्वोत्कृष्ट फलंदाज पुरस्कार योगेश काशीद तर सर्वोत्कृष्ट गोलंदाज पुरस्कार गणेश देहाडराय यांना देण्यात आला. पुरस्कार वितरण अमित मुथा मुथा व संजय चोपडा यांच्या हस्ते झाले. यावेळी जॉईंट सीईओ नितीन भंडारी, चंद्रकांत वाणी, कर्मचारी संचालक प्रसाद गांधी, जितेंद्र बोरा आदी उपस्थित होते. स्पर्धेच्या नियोजनासाठी प्रसाद गांधी, अमित सोनग्रा, स्वप्निल बोराना, अफजल खान आदींनी परिश्रम घेतले.

# वार्षिक भविष्य - सन २०२५

आपणा सर्वांना हे नवीन वर्ष २०२५ हे सुखसमृद्धी, भरभराटीचे, ऐश्वर्य संपन्न व आपल्या मनातील सर्व इच्छा-आकांक्षा पूर्ण करणारे जावो हीच ईश्वरचरणी प्रार्थना. तसेच आपण सर्वांनी मला मागील वर्षीचे वार्षिक-भविष्य आवडल्याचे तंतांतंत लागू पडल्याचे प्रत्यक्ष भेटून व्हॉटसॲपच्या माध्यमातून, मॅसेजवरून आवडल्याचे कळविले. त्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार. याही वर्षी आपण असाच प्रतिसाद द्यावा, अशी अपेक्षा सर्व वाचकांकडून करतो.

**धनयोग....!**

माझ्याकडे येणाऱ्या जातकापैकी ८०% जातक प्रश्न विचारतात की, माझ्या पत्रिकेत धनयोग आहेत का? मधेच माझी नोकरी बदलेल का? नोकरी बदलली तर दुसरी नोकरी लगेच लागेल का? व्यवसाय व्यवस्थित चालेल का? असे एक ना अनेक प्रश्न विचारतात. अर्थात त्याबद्दल कुणालाही दोष देता येणार नाही. एखादी धनवान व्यक्ती कितीही संपत्ती असली तरी तिचा मोह काही सुटत नाही. प्रत्येक गरीब व्यक्तीला श्रीमंतीकडे प्रवास करावा वाटतो व त्यात गैरही काही नाही. वास्तविक गरीबी हे माणसाच्या नकारात्मक भूमिकेचे फळ आहे. जगात असा कोणताच प्रश्न नाही की, ज्यावर उपयाय नाही, उत्तर नाही, या दृष्टिने विचार केल्यास गरीबी हा रोग बरा करता येण्यासारखा आहे. मात्र यातून बाहेर पडण्याची दुर्धर इच्छा असली पाहिजे व याची जाणीव व्हायला हवी त्यासाठी नियोजनपूर्वक प्रयत्न करणे गरजेचे आहे. जन्मकुंडलीतील द्वितीय स्थान म्हणजे धनस्थान. पंचमस्थान म्हणजे सुतस्थान, अष्टमस्थान म्हणजे अचानक धनलाभाचे स्थान तर लाभस्थान म्हणजे लाभाचे स्थान. कुंडलीतील ही चार स्थाने विविध प्रकारच्या लाभाची आहेत. शुभग्रह असतील तर यथाचित धनयोग भरपूर होतो. बऱ्याच ठिकाणाहून अनपेक्षित धनलाभ होतो. या उलट वरीलपैकी स्थानात पापग्रह असतील तर आहे त्या धनाचा लाभ होऊ शकतो. परंतु काहीही असले तरी आजही ज्यांचा चांगला आर्थिक विकास झाला आहे, प्रगती झाली आहे त्या व्यक्तींनी यशासाठी कार्य केले आहे! या अभ्यास आपण करावा व त्याप्रमाणे कृती करावी. तसेच आवश्यक असेल तरच खर्च करावा.

तीच गोष्ट शेअर बाजार व क्रेडिट कार्डाची आपला शेअर बाजाराचा अभ्यास असेल तर पैसे गुंतवावेत. नाहीतर गुंतवू नयेत. कारण कमी कष्टात आपण खूप पैसे कमविण्याचे स्वप्न पहातो. परंतू खूप काही कमविण्याच्या नादात आपण सर्व गमावून बसतो. मानवी जीवन जगत असताना धनवृद्धी वाढीसाठी आपल्या वेदामध्ये भरपूर मंत्र, स्तोत्र, सूक्त दिली आहेत. तेव्हा त्याचा प्रत्येकांनी फायदा घेऊन आपले जीवन सुखी करावे. पण हे स्तोत्र किंवा मंत्र म्हटल्याने आपला भाग्योदय होईल आणि आपली सर्व तंगी समाप्त होईल. या आशेवर जगत असाल तर आपला शेवट कधी होईल हे सांगता येणार नाही. तेव्हा पूर्ण नशिबावर अवलंबून न राहता प्रयत्नांवर अवलंबून रहावे. नाहीतर..

*गणपतवाणी बिडी पिताना, चावायाचा नुसतीच काडी,*
*मिचकावून अन् डोळे दोन म्हणायचा, या जागेवर बांधीन माडी.*

तेव्हा कोणताही आळस न करता आपली बुद्धी वापरून पुढे जाण्याचा प्रयत्न करावा हाच या नवीन वर्षांचा संदेश आहे.

## अतिसावधानतेचा इशारा

ज्या व्यक्तींची जन्मतारीख १६ मार्च ते १० एप्रिल आहे. तसेच ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा चरण - ३ व ४ आहे. त्यांनी पुढील बाबतीत सावधानता बाळगावी.

या कालावधीमध्ये आपणास एक प्रकारचे नैराश्य जाणवणार आहे. तेव्हा कन्या, मीन, मेष, कुंभ या राशींनी काळजी घ्यावी. आपण कोणत्याही प्रकारचा सात्विक संताप करून घेऊ नये. तसे केल्यास त्याचा त्रास आपल्यालाच होईल. कोणताही नियम अथवा कायदा मोडू नये. तसे केल्यास प्रचंड मानसिक त्रासातून आपल्याला जावे लागेल. आपला पाल्य इ. १० वी किंवा इ. १२ वीला असेल तर, त्याच्या वर्तणुकीवर पालकांनी लक्ष द्यावे. आपल्या पाल्याचे अभ्यासावरील लक्ष कमी होण्याची शक्यता तसेच असंगाशी संग होणार नाही याची दक्षता घ्यावी. आपण पालक या नात्याने आपल्या पाल्यांना आधार द्यावा. नोकरदारांनी आपल्या वरिष्ठापासून सावध रहावे. व्यावसायिकांनी अत्यंत काळजीपूर्वक निर्णय घ्यावेत. विवाह ठरविणे, प्रॉपर्टी खरेदी-विक्री यासाठी अत्यंत काळजीपूर्वक व्यवहार करावेत. जुने आजार पुन्हा डोके वर काढू शकतात किंवा अनपेक्षितपणे एखादा आजार पुन्हा डोके वर काढू शकतो किंवा अनपेक्षितपणे ऑपरेशनचे योग येऊ शकतात. कोर्ट-कचेरी अचानक उद्भवू शकते. या कालखंडात कुणालाही जामीन राहू नये. हात उसने पैसे देऊ नयेत. पुन्हा मिळण्याची शक्यता कमी. गर्भवती महिलांनी काळजी घ्यावी. नवविवाहितांच्या जीवनात अडचणी येऊ शकतात. पती-पत्नीने एकमेकांना सांभाळून घ्यावे. परंतु टोकाची भूमिका घेऊ नये. तसेच वाहन चालविताना अत्यंत सावकाश चालवावे. तेव्हा वरील कालावधीतील या राशीच्या व्यक्तींनी अत्यंत काळजीपूर्वक वागावे.

**मेष**

## अध्यात्माकडे वाटचाल...!

आपली राशीचक्रातील पहिली रास. आपल्याला कितीही अडचणी आल्या तरी जीवनाशी पुढे टक्कर देत आपण पुढे जात असता. मागील दोन वर्षे आपणाला चांगली गेली. पण, या वर्षात आपली अध्यात्माकडे वाटचाल होईल. त्यातच साडेसातीला सुरुवात होईल. परंतु तुर्त तरी त्याचा धसका न घेता अखंड सावधान रहावे. या वर्षात अविवाहितांचे विवाह ठरतील. मनाप्रमाणे जोडीदार मिळेल. तसेच पर्यटनाचे योग आहेत. धार्मिक स्थळी भेट देण्याचे योग आहेत. आपला पाल्य यावर्षी इ. १० वी/इ. १२ वीला असेल तर त्याला अपेक्षित यश मिळेल. नोकरदारांना एकप्रकारे नैराश्य जाणवेल. व्यावसायिकांनी धीरोदत्तप्रमाणे आपली प्रगती साधावी. नवविवाहितांना चांगली बातमी ऐकावयास मिळेल. स्थावर-प्रॉपर्टीचे कामे धिम्या गतीने मार्गी लागतील. राजकारणी व्यक्तींनी सावधपणे आपली पाऊले टाकावीत. नाहीतर आपला आपटबार कधी कसा होईल? हे सांगता येणार नाही. कलाकारांना या वर्षात संमिश्र अनुभव येतील. कोर्ट-कचेरीच्या कामात विलंबाने यश मिळेल. उच्च शिक्षणासाठी परदेशी जाण्याची इच्छा असेल तर विद्यार्थ्याला यश मिळू शकेल. आपले शेजारी अथवा नातेवाईकांशी संबंध बिघडले असतील तर ते चांगले होतील.

जानेवारी/फेब्रुवारी २०२५ :- वाहन चालवताना अत्यंत सावकाश चालवावे. अनपेक्षितपणे खर्च वाढेल. खर्चावर नियंत्रण राहणार नाही.

मार्च/एप्रिल :- या महिन्यात साडेसातीला सुरुवात होईल. त्यामुळे आपण सावध रहावे. तसेच अनपेक्षित खर्चावर नियंत्रण राहणार नाही.

मे/जून :- उत्साहात दिवस जातील. अनेक ओळखी होतील व त्याचा उपयोग नोकरी, व्यवसायात होईल.

जुलै/ऑगस्ट :- संततीच्या संदर्भात निर्णय घेताना जपून घ्या. कारण निर्णय चुकण्याची शक्यता. मानसिक संतुलन बिघडणार नाही याची दक्षला घ्यावी. तसेच महत्वाची बातमी समेजल.

सप्टेंबर/ऑक्टोबर :- स्थावराची कामे मार्गी लागतील. आईचा संपर्क वाढेल. तसेच शेती, व्यवसायाची कामे मार्गी लागतील.

नोव्हेंबर/डिसेंबर :- शेअर्समध्ये फायदा होईल किंवा अचानक धनलाभाचे योग आहेत. नोकरी, व्यवसायाच्या ठिकाणी हितशत्रू डोके वर काढण्याची शक्यता.

**उपासना :- श्रीगणेशाची उपासना करावी.**

**वृषभ**

## कामात अडथळे...आर्थिक वृद्धी

मुळातच आपला स्वभाव चैनी, हौशी, मौज-मजा करणारा असा आहे. तरी सुद्धा आपल्याला बोधचिन्हाप्रमाणे काम करायला आवडते. त्यामुळे कष्टाच्या मानाने यश कमी मिळते व आपण मागे राहता. या वर्षात आर्थिक वृद्धी होईल. मागील येणी वसूल होतील. तसेच या सर्व गोष्टी करताना अडथळे येण्याची शक्यता. कोर्ट-कचेरीच्या कामात यश मिळेल. तसेच नोकरी-व्यवसायात नवीन कल्पना सुचतील व त्या अंमलात आणण्याचा प्रयत्न करावा. अविवाहितांचे विवाह ठरतील. तसेच नवविवाहितांना सुद्धा हे दिवस चांगले आहेत. आपला पाल्य इ. १० वी, इ. १२ वीला असेल तर त्याला चांगले यश मिळेल. तसेच संततीच्या संदर्भात घेतलेले निर्णय योग्य राहतील. सामाजिक क्षेत्रात यश मिळेल. स्थावर-प्रॉपर्टीच्या संदर्भात एखादी चांगली घटना घडेल. नवीन खरेदी करण्याचे योग आहेत. राजकारणी व्यक्ती/कलाकारांना हा कालखंड अतिशय चांगला आहे. उच्च शिक्षणासाठी परदेशी जाण्याचे योग आहेत. या वर्षात कोणत्याही परिस्थितीत निराशाजनक कालखंड असणार नाही. शेजारी व नातेवाईक यांच्याशी संबंध चांगले राहतील. आपल्या पाल्याला योग्य प्रोत्साहन द्यावे.

जानेवारी/फेब्रुवारी २०२५ :- अनपेक्षितपणे आपल्याला मोठ्या प्रमाणावर पैसा खर्च करावा लागेल. नोकरी/व्यवसायात प्रचंड ओळखी होतील.

मार्च/एप्रिल :- लाभात थोडे अडथळे निर्माण होतील. परंतु प्रतिष्ठेला कोणतीही बाधा येणार नाही.

मे/जून - आर्थिक वृद्ध होईल. नोकरी/व्यवसायात नवीन कल्पना सुचतील. बोलण्यातून गैरसमज होणार नाही. याची दक्षता घ्यावी.

जुलै/ऑगस्ट - कोणतेही कारण नसताना एखादा निर्णय चुकीचा होईल व त्याचा फटका बसण्याची शक्यता जास्त तसेच लेखक व प्रकाशकांना कालखंड अतिशय उत्तम राहील.

सप्टेंबर/ऑक्टोबर - जर आपण ५५ वर्षाच्या वयापेक्षा जास्त असाल तर ऑपरेशनचे योग आहेत. इतरांनी आपले आरोग्य सांभाळावे.

नोव्हेंबर/डिसेंबर - अविवाहितांचे विवाह ठरतील. तसेच वाहन चालविताना या महिन्यात योग्य ती काळजी घ्यावी. तसेच कुणालाही अपमानास्पद बोलू नये.

**उपासना :- श्री दुर्गास्तोत्र वाचावे.**

**मिथुन**

## सामाजिक प्रतिष्ठा व आर्थिक वृद्धी

आपली रास प्रचंड बुद्धीमान. समय सूचकता, हास्यविनोद, वैचारिक परिवर्तन, पराकोटीची सहनशीलता या सर्व गुणांचा चांगला उपयोग या वर्षात आपल्याला होणार आहे. आत्तापर्यंत आपण बऱ्यापैकी हालअपेष्टा सोसल्या. आता त्या अजिबात राहणार नाहीत. त्यामुळे निश्विंत रहा. आपल्या आर्थिक वृद्धीत तर भर पडणारच आहे. त्यामुळे निश्चिंत रहा. नोकरी/व्यवसायात नवनवीन कल्पना राबवा. सर्व कल्पना फलद्रुप होतील. अविवाहितांचे विवाह ठरतील. नवविवाहितांकडून चांगली बातमी मिळेल. स्थावर इस्टेटीची कामे मार्गी लागतील. तसेच एप्रिल २०२५ नंतर आपल्याला खुप जुने सहकारी अनपेक्षितपणे नोकरी/व्यवसायाच्या निमित्ताने भेटेल आणि सर्वात महत्वाचे म्हणजे त्यापासून लाभ होईल. आपण या संधीचा पुरेपूर फायदा घ्यावा. नोकरीमध्ये प्रमोशन मिळेल. त्यामुळे आपल्या राजकारणी व्यक्तींची या कालखंडामध्ये चांगलीच चलती होईल तसेच कलाकारांना सुद्धा नवीन प्रकारची आव्हानात्मक कामे मिळतील व त्यात चांगले यश मिळेल. आपला पाल्य जर इ. १० वी, इ. १२ वीला असेल तर त्याला चांगले यश मिळेल.

जानेवारी/फेब्रुवारी २०२५ :- उत्साहवर्धक काळ असला तरी, आरोग्याच्या तक्रारी निर्माण होऊ शकतात. नोकरी/व्यवसायात नवीन ओळखी व कल्पना सुचतील.

मार्च/एप्रिल - अनपेक्षित खर्चात वाढ होईल. चैनी मित्रापासून सावध रहा.

मे/जून - कुटूंबासाठी खर्च केला जाईल व त्यावर कोणतेही नियंत्रण असणार नाही. प्रवासाचे योग आहेत.

जुलै/ऑगस्ट - स्थावर इस्टेटीचे कामे मार्गी लागतील. तसेच वाहनापासून काळजी घ्या. थोडाफार धोका संभवत आहे.

सप्टेंबर/ऑक्टोबर - नोकरीत थोडेफार आळशीपणा येण्याची शक्यता. मात्र त्याचवेळी आपल्याला नोकरीच्या ठिकाणी खूप जुना मित्र भेटेल. मातृसौख्य लाभेल.

नोव्हेंबर/डिसेंबर - उष्णतेचे विकार बळावतील. तसेच आपण आपल्या जोडीदाराबरोबर कोणत्याही प्रकारचे वाद होणार नाहीत याची दक्षता घ्यावी. बोलताना संयम अत्यंत आवश्यक आहे.

**उपासना :- श्रीव्यंकटेश स्तोत्र वाचावे.**

**कर्क**

## मनःशांती मिळेल, अध्यात्माकडे वाटचाल

स्वभाव अत्यंत संवेदशनाशील. परंतु एखादी व्यक्ती सहज बोलली तरी आपल्याला समोरच्या व्यक्तीचे बोलणे लागते. वेदना होतात आणि न कळत दुखावले गेल्यास आपल्या डोळ्यातून पाणी आल्याशिवाय रहात नाही. परंतु या वर्षात आपल्याला अशाप्रकारचे अनुभव कमी येतील. मनः शांती मिळेल. कोरोना कालखंड आपल्याला खूपच खराब गेला. स्थावर-इस्टेटीची कामे मार्गी लागतील. त्यासाठी कर्ज घेण्याचे योग आहेत. तसेच अविवाहितांचे विवाह ठरतील व महत्वाचे म्हणजे मनासारखा जोडीदार मिळेल. नवविवाहितांना आनंदाची बातमी मिळेल. सुशिक्षित बरोजगारांना नोकरी मिळेल. नोकरीच्या वेगवेगळ्या स्वरूपाच्या संधी खुणावतील. तेव्हा या चांगल्या संधीचा फायदा जरूर या वर्षात घ्यावा. कोर्ट-कचेरीच्या कामात यश मिळेल. नोकरी/व्यवसायात नवीन कल्पना सुचतील. तसेच नवीन कल्पनांची आपल्याकडून अंमलबजावणी होईल. राजकारणी तसेच कलाकार मंडळींना हा कालखंड अविस्मरणीय असाच जाईल. मागील काही वर्षात आपले झालेले तोटे कुठेतरी भरून निघतील. धार्मिक स्थळी यात्रा होण्याचे योग आहेत. एकंदरीत या वर्षात आनंदी आनंद राहील. उत्तम जनसंपर्क तयार होत असल्यामुळे महत्वाची कामे विनाविलंब होतील.

जानेवारी/फेब्रुवारी २०२५ :- कोणताही निर्णय घेताना काळजीपूर्वक घ्या. अन्यथा महत्वाचे निर्णय चुकतील.

मार्च/एप्रिल :- अत्यंत उत्साहवर्धक कालखंड राहील. नोकरी/व्यवसायात अनपेक्षितपणे राहिलेली कामे होतील. तसेच नवीन ओळखी होतील.

मे/जून :- एकप्रकारची सामाजिक प्रतिष्ठा लाभेल. तसेच स्थावर इस्टेटीचे कामे मार्गी लागतील.

जुलै/ऑगस्ट :- स्वभावाचा कल चैन करण्याकडे राहील. तसेच जुनी येणी वसूल होतील. परदेशवारीचे किंवा प्रवासाचे योग आहेत.

सप्टेंबर/ऑक्टोबर :- आपल्या सहकाऱ्यांशी वागताना सांभाळून वागावे. तसेच कोणत्याही प्रकारची भांडणे होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

नोव्हेंबर/डिसेंबर :- आरोग्याची विशेष काळजी घ्यावी. शेअर्समध्ये फायदा होण्याचे योग आहेत.

**उपासना :- श्री शंकराची उपासना करावी.**

**सिंह**

## यशाची चढती कमाल राहील...

मागील दोन वर्षापासून म्हणजेच २०२३ व २०२४ या वर्षात आपल्याला नको-नकोसे झाले होते. मुलतःच आपला स्वभाव अत्यंत मनमोकळा, उदार, प्रचंड आशावादी व ध्येयवादी असा आहे आणि या स्वभावालाच गेल्या दोन वर्षात अडथळा आला होता व नैराश्य आले होते. या वर्षात नैराश्य आपल्याला राहणार नाही व वरील सर्व गुणांचे उपयोग आपल्याला येथून पुढील कालखंडात करता येईल. अविवाहितांचे विवाह ठरतील. विचार ठरविताना कालखंड अतिशय उत्कृष्ट आहे. त्यामुळे निर्णय चुकण्याची शक्यता कमीच आहे. सुशिक्षित बेरोजगारांना नोकरी लागेल. कुठलीही अडचण येणार नाही. स्थावर इस्टेटीची कामे मार्गी लागतील. तसेच नवविवाहित असल्यास संतती प्राप्तीचे योग आहेत. कोर्ट-कचेरीच्या कामात यश मिळेल. एप्रिल २०२५ मध्ये न्यायाधिशांची बदली होईल व आपल्याला उर्वरित कामात यश मिळेल. नोकरी/व्यवसायात प्रगती होईल. नोकरीत वरिष्ठ आपल्या कामावर खुश राहतील. राजकारणी व कलाकार यांना यावर्षात खूपच चांगल्या कल्पना सुचतील. त्यांच्यावर कुठलेही मानसिक दडपण राहणार नाही. ज्यांचा पाल्य इ. १० वी, इ. १२ वीला असेल त्याला आपल्या अपेक्षेपेक्षा जास्त यश मिळेल. तसेच त्यांच्या बाबतीत घेतलेले निर्णय योग्य राहतील. महत्वाचे म्हणजे पालक म्हणून आपल्यावर दोष येणार नाही.

जानेवारी/फेब्रुवारी २०२५ :- या नवीन वर्षात स्थावर इस्टेटीची कामे मार्गी लागतील. तसेच संततीविषयक समस्या सुद्धा दूर होतील.

मार्च/एप्रिल :- मनावरील दडपण कमी होईल व आपला आपल्याच एक वेगळ्या प्रकारचा फिल निर्माण होईल. तसेच महत्वाची बातमी समजेल.

मे/जून :- नोकरीमध्ये वरिष्ठ आपल्यावनर खुश राहतील. तसेच त्यांच्याकडून आपण आपल्या मनासारखे काम करून घेऊ शकता.

जुलै/ऑगस्ट :- आजारपणावर अनपेक्षित खर्च होईल तसेच बोलताना संयम आवश्यक नाहीतर, अनावश्यक भांडणे होतील व शत्रुत्व वाढेल.

सप्टेंबर/ऑक्टोबर :- हे दोन महिने अत्यंत उत्साहवर्धक जातील. तसेच जुनी येणी वसूल होतील. तसेच एखादे महत्वाचे काम होईल.

नोव्हेंबर/डिसेंबर :- वास्तूविषयक/वाहनविषयक महत्वाचे कामे मार्गी लागतील. त्यासंदर्भात घेतलेले निर्णय अतिशय योग्य राहतील.

**उपासना :- श्री सूर्यकवच वाचावे.**

**कन्या**

## प्रतिष्ठा राहील... मात्र मनावर दडपण राहील

आपल्याकडे निसर्गदत्त गुणांची खाण आहे. उत्तम वक्तृत्व, हजरजबाबीपणा, उत्कृष्ट निरीक्षण व परीक्षण, धूर्तपणा या सर्व गोष्टी आहेत. यावरच आपल्या यशाची कमान आत्तापर्यंत होती आणि राहिल. बोलण्यात कधी कधी मोकळेपणा नसतो या गुणांचा फायदा आपल्याला या कालखंडात होईल. आणि या वर्षात आपण प्रगतीपथावर रहाल. परंतु मनावर एकप्रकारचे दडपण राहील तसेच आपल्याला काही लाभ होताना विलंबाने होतील. अविवाहितांनी विवाह ठरविताना विचार करुन निर्णय घ्यावा म्हणजे नंतर पश्चातापाची वेळ येणार नाही तसेच, नवविवाहितांनी कोणतेही कारण नसताना भांडण करू नये. अन्यथा एकमेकांचे (पती-पत्नीमध्ये) गैरसमज होतील व ती भांडणे दीर्घकाळ चालतील. आपला पाल्य इ. १० वी, इ. १२ वीला असेल तर त्याच्या वर्तणुकीवर लक्ष ठेवावे. अन्यथा तो अभ्यासाच्या नावाखाली इतर गोष्टीकडे लक्ष देऊ शकतो. कोर्ट-कचेरीच्या कामात तूर्तास यश येणार नाही किंवा त्या वाट्याला जाण्याचा प्रयत्न करु नये. नोकरी/व्यवसायात प्रगती म्हणजे अडथळ्याची शर्यत होय. नोकरीत आपल्या वरिष्ठांचे मत आपल्याबद्दल चांगले असणार नाही. त्यामुळे वरिष्ठापासून चार हात लांब रहावे. राजकारणी/ कलाकार या व्यक्तींना सुद्धा सामाजिक विरोधाला तोंड द्यावे लागेल.

जानेवारी/फेब्रुवारी २०२५ :- या नवीन वर्षात आपले नवीन ओळखी होण्याचे योग आहेत. तसेच लांबच्या नात्यातील बहिण-भावांचा संबंध येईल.

मार्च/एप्रिल :- महत्वाची नवीन बातमी समजेल. तसेच एखादी व्यक्ती योग्य सल्ला देणारी असेल. परदेशगमनासाठी प्रयत्न करीत असल्यास जरूर प्रयत्न करावे.

मे/जून :- जुनी येणी वसूल होतील. तसेच अनपेक्षित प्रवासाचे योग आहेत व आपल्या लिखाणाला चांगली प्रसिद्ध मिळेल.

जुलै/ऑगस्ट :- शनि-मंगळ प्रतियोग असल्यामुळे प्रतिकुलता जाणेवल. व्यवसायात अडथळे आहेत. तसेच काहींना अनपेक्षित ऑपरेशनचे योग आहेत.

सप्टेंबर/ऑक्टोबर :- स्थावर इस्टेटीचे कामे मार्गी लागतील. तसेच, या दोन महिन्यात आपण थोडे बोलण्यावर नियंत्रण ठेवावे. तसेच, नोकरदारांची अचानक बदली होईल.

नोव्हेंबर/डिसेंबर :- वाहन चालविताना सावकाश चालवा. परदेशात जाण्यासाठी प्रयत्न करीत असाल तर अवश्य करावा.

**उपासना :- श्री विष्णूसहस्त्रनाम वाचावे.**

**तुळ**

## पूर्वार्ध अपयश मात्र, उत्तरार्ध मनाप्रमाणे

मागील मार्च २०२३ पासून आपला सात्विक संताप वाढला आहे. तसेच संततीच्या बाबतीत काय निर्णय घ्यावा? याचा अंदाज आपल्याला अजून झालेला नाही. वास्तविक आपण सर्व बाजूंनी समतोल विचार करता. कुठेही, कुणावरही अन्याय होऊ देत नाही. ही आपली खासियत पण आपल्या मूळ स्वभावाला योग्य न्याय मिळेल तो १ जून २०२५ नंतर तेव्हा अजिबात काळजी करू नका. या वर्षातील पहिले ६ महिने मात्र आपल्याला त्रास राहील. नंतरचे ६ महिने म्हणजेच काळावर राज्य येईल. या कालखंडात आपण आपल्या मुलामुलींचे कालखंडात चांगली बातमी मिळू शकेल. नवविवाहितांचे स्वप्नरंजन पूर्ण होईल. सुशिक्षित बेरोजगारांना चांगली नोकरी लागेल. स्वतःबरोबरच आपल्या आई-वडिलांचे स्वप्न साकार होईल व एकप्रकारे वेगळाच आनंद मिळेल. कोर्ट-कचेरीच्या कामात यश मिळेल. नोकरी/व्यवसायात नवीन कल्पना सुचतील आणि त्याची अंमलबजावणी होईल. नोकरीमध्ये वरीष्ठ आपल्यावर खुश राहतील. स्थावर प्रॉपर्टीचे कामे मार्गी लागतील. तसेच, राजकारणी लोकांना हा कालखंड चांगला राहील. एकंदरीतच या वर्षीच्या पूर्वार्धात आपल्याला प्रयत्नावर भर द्यावा लागेल. मात्र जून २०२५ नंतर आपल्याला पुन्हा मागे वळून पहावे लागणार नाही.

जानेवारी/फेब्रुवारी २०२५ :- या नवीन वर्षात आपल्याला एखादी मार्गदर्शक व्यक्ती भेटेल व हाताखालील नोकरापासून काहीतरी महत्वाची बातमी समजेल.

मार्च/एप्रिल :- नोकरदारांची बदली होण्याची शक्यता. मामा-मावशीकडून काहीतरी लाभ होण्याची शक्यता. तसेच, मनावरील ताण हलका होईल.

मे/जून :- शनिपालट व गुरुपालट झाल्यामुळे आपल्यालाल हा कालखंड खूपच अविस्मरणीय जाईल.

जुलै/ऑगस्ट :- अनपेक्षित खर्चाचे योग. कुटूंबातील ज्येष्ठांच्या आजारपणावर खर्च होईल. समाजात नवीन ओळखी होतील.

सप्टेंबर/ऑक्टोबर :- अत्यंत उत्साहवर्धक व कालखंड राहील. नोकरदारांना ऑक्टोबरमध्ये प्रमोशन मिळेल.

नोव्हेंबर/डिसेंबर :- प्रवासाचे योग आहेत. जुनी येणी वसूल होतील.

**उपासना :- श्री दुर्गास्तोत्र वाचावे.**

**वृश्चिक**

## कमी खुशी... कभी गम..!

आपला स्वभाव विचारी, मनांचा समतोलपणा राखणारा, कोणत्याही परिस्थितीत बदल झाल्यास शांतपणे सामोरे जाणारा व अत्यंत निश्चयी असा स्वभाव आहे. आपल्याकडून इतरांच्या अगदी न कळत भावना दुखावल्या जातात व आपल्याला अनेक शत्रू निर्माण होतात. आता या प्रकारचा अनुभव आपल्याला १ जून २०२५ नंतर येईल. प्रत्येक कामात अडथळे येतील. तसेच, शत्रूत्वामध्ये वाढ होईल. तेव्हा ३१ मे २०२५ पूर्वी महत्वाची कामे पूर्ण करून घ्यावीत. या कालखंडात, म्हणजेच ३१ मे पूर्वी, अविवाहितांचे विवाह ठरतील. त्यांना मनाप्रमाणे वधू/वर मिळू शकतो. नवविवाहितांना आनंदाची गोड बातमी समजेल. तसेच, सुशिक्षित बेरोजगारांना चांगली नोकरी लागेल व कमीत कमी एक वर्ष नोकरी टिकवून ठेवावी. अन्यथा नवीन नोकरी लवकर लागणार नाही. त्यामुळे वरिष्ठांशी अत्यंत काळजीपूर्वक वागावे. कोर्ट-कचेरीचे कामे लवकर करून घ्या. अन्यथा लांबणीवर पडतील व ती कामे लवकर मिळणार नाही. नोकरी/व्यवसायात पूर्वार्धात प्रगती आहे. मात्र उत्तरार्धात आपल्याला काम जास्त राहील व पैसे कमी मिळतील. परंतु प्रतिष्ठा मात्र शाबूत राहील. प्रतिष्ठेला कुठेही धक्का लागणार नाही. राजकारणी लोकांनासुद्धा वरीलप्रमाणेच कालखंड असेल. मात्र, कलाकारांकडून काही महत्वाची कामे निसटून जातील. या पूर्ण वर्षात पाल्याच्या वर्तणुकीवर लक्ष ठेवावे. म्हणजे पालक म्हणून आपल्यावर मनःस्तापाची वेळ येणार नाही. उत्तरार्धात निर्णय घेताना जपूनच घ्यावेत.

जानेवारी/फेब्रुवारी २०२५ :- वाहन चालविताना सावकाश व सावधानतेने चालवा. म्हणजे पुढील अनर्थ टळतील.

मार्च/एप्रिल :- धार्मिक स्थळी भेट देण्याचे योग आहेत. तसेच शेअर्समध्ये फायदा होईल. नवविवाहितांना आनंदाची बातमी समजेल.

मे/जून :- नोकरदारांची अनपेक्षित बदली होईल व त्याठिकाणी कामाचा व्याप जास्त असेल. तसेच व्यावसायिकांना नमते घ्यावे लागेल.

जुलै/ऑगस्ट :- जोडीदाराकडून फायदा होईल. तसेच आर्थिक लाभ होईल. आरोग्याची काळजी घ्यावी.

सप्टेंबर/ऑक्टोबर :- हे दोन्ही महिने उत्साहवर्धक जातील. या महिन्यात राहिलेले सर्व कामे करून घ्यावीत. म्हणजे मनःस्ताप टळेल.

नोव्हेंबर/डिसेंबर :- आजारपणावर खर्च होईल. तसेच घरामध्ये पाहुण्यांची वर्दळ वाढेल. हितशत्रूंपासून सावध रहावे. अन्यथा मोठा धोका संभवतो.

**उपासना :- श्री गणेशाची व श्री दत्तात्रयांची उपासना करावी.**

**धनु**

## इस्टेटीचे कामे मार्गी लागतील

आपल्या चेहऱ्यावर विद्वत्ता व सात्विकतेचे तेज, तसेच निर्णय घ्यायला स्वतःला उशीर होत असला तरी इतरांना मात्र आपण उत्कृष्ट मार्गदर्शन करता तसेच सन्मार्गाने पुढे जाण्याची आपली प्रवृत्ती असा आपला स्वभाव आणि नेमक्या याच स्वभावाला अनुसरून आपल्याला हे वर्ष जाणार आहे. आपले या वर्षात सर्वात महत्वाचे म्हणजे स्थावर इस्टेटीचे काम मार्गी लागेल किंवा स्थावर इस्टेटीमध्ये भर पडेल. न भूतो न भविष्यती असे आपले वास्तूविषयक स्वप्न पूर्ण होईल. अविवाहितांना स्वप्नातील राजकुमार/राजकुमारी भेटेल. त्याच्या सर्व मनोकामना पूर्ण होतील. तसेच यावर्षात आपल्याला कोणत्याही प्रगतीच्या मर्यादा नाहीत. नोकरी/व्यवसायात आपली प्रगती जोरात राहील. नोकरीत वरिष्ठ आपल्या खुश राहतील. सुशिक्षित बेरोजगारांना नोकरी लागेल. कोर्ट-कचेरीच्या कामात यश मिळेल. जेवढी वैयक्तिक प्रकरणे आपणास मिटविता येतील. तेवढी मिटवा. म्हणजे पुढे भविष्यात त्रास होणार नाही. राजकारणी/कलाकारांना हा कालखंड अतिशय चांगला जाईल. कुठेही मागे वळून पहाण्याची वेळ येणार नाही. नवविवाहितांना आनंदाची बातमी समजेल.

जानेवारी/फेब्रुवारी २०२५ - जोडीदाराबरोबर मतभेद संभवतात. तसेच जुनी येणी सुद्धा वसूल होतील. मात्र बोलण्यावर संयम आवश्यक.

मार्च/एप्रिल - या महिन्यापासून स्थावर इस्टेट घेण्याचे योग आहेत. तसेच संततीच्या संदर्भात एखादा महत्वाचा निर्णय होईल.

मे/जून - शेअर्समध्ये लाभ होईल. तसेच एखादी मार्गदर्शक व्यक्ती आपल्याला या महिन्यात भेटेल. अविवाहितांचे विवाह ठरण्याची शक्यता.

जुलै/ऑगस्ट - नोकरदारांची बदली होण्याची शक्यता. तसेच आपल्या एखाद्या जीर्ण आजारावर चांगले डॉक्टर मिळतील.

सप्टेंबर/ऑक्टोबर - हा महिना आपल्याला प्रचंड अविस्मरणीय जाईल. नोकरी/व्यवसायात प्रचंड आवक राहील. महत्वाच्या बातम्या समजतील. मनावरील दडपण दूर होईल.

नोव्हेंबर/डिसेंबर - महत्वाचे निर्णय चुकण्याची शक्यता. त्यामुळे महत्वाचे निर्णय घेऊ नयेत. बोलताना संयम आवश्यक.

**उपासना :- श्री दत्तात्रयांची उपासना करावी.**

**मकर**

## साडेसाती संपणार, मात्र आरोग्य सांभाळा

आपल्याला कोरोनाच्या काळात म्हणजेच जानेवारी २०२० ते डिसेंबर २०२१ या दरम्यान बराच त्रास झाला. मात्र आपण चिकाटीच्या जोरावर, प्रतिकूलतेवर मात करीत इथपर्यंत आलात. मात्र, आता अजिबात काळजी करू नका. २९ मार्च २०२५ नंतर साडेसाती संपेल व आपली राहिलेली सर्व कामे पूर्ण होतील. आपला एकंदरीतच शिस्तप्रिय स्वभाव आहे. शिस्त मोडली तर आपण वाईटपणा घेण्यास कचरत नाही. तसेच मार्मिक व कुत्सित बोलणे आपल्या स्वभावाचाच एक भाग. परंतु आता काळजी करू नका. घौडदौड अत्यंत जोरात चालू राहील. या वर्षात अविवाहितांचे विवाह ठरतील. नवविवाहितांना आनंदाची बातमी समजेल. तसेच सुशिक्षित बेरोजगारांना अपेक्षेपेक्षा नोकरी चांगली लागेल. त्यामुळे त्यांनी या चांगल्या कालखंडाचा फायदा जरूर घ्यावा व आपली प्रगती साधावी. कोर्ट-कचेरीचे कामे आटोक्यात येतील. पर्यायी मार्ग सुचतील व त्यात आपल्याला यश येईल. नोकरी/व्यवसायात चांगले यश मिळेल. बऱ्याच दिवसापासूनचे राहिलेले अपूर्ण स्वप्न पूर्ण होईल. स्थावर इस्टेटीची कामे पूर्ण होतील. तसेच आपण परदेशगमन करण्याचा विचार करीत असाल तर त्यात यश मिळेल. उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षण पूर्ण होईल व त्यात यश मिळेल. राजकारणी/कलाकार यांच्याही प्रगतीच्या वाटा मोकळ्या होती व आपल्या कार्यक्षेत्रात पुढे जाण्याची संधी मिळेल. जोडीदाराबरोबर मतभेद संभवतात. मात्र हे मतभेद चहाच्या पेल्यातील असतील. जुनी येणी वसूल होतील. अचानक धनलाभ होईल.

जानेवारी/फेब्रुवारी २०२५ :- स्थावर इस्टेटीच्या खरेदी विक्रीच्या संदर्भात सावधपणे व्यवहार करावेत. नाहीतर फसगत होण्याची शक्यता.

मार्च/एप्रिल :- या महिन्यातून आपली साडेसाती संपेल व नवीन बातमी समजेल.

मे/जून :- बोलताना अत्यंत संयम बाळगावा. नोकरदारांना अचानक नोकरीत बढतीची जागा तात्पुरत्या स्वरूपात मिळू शकते.

जुलै/ऑगस्ट :- संततीविषयक सर्व समस्या मिटतील. अचानक धनलाभाचे योग आहेत. शेअर्समध्ये चांगला फायदा होईल.

सप्टेंबर/ऑक्टोबर :- नोकरीच्या ठिकाणी आपण शांत रहावे. नाहीतर सहकाऱ्यांसोबत भांडणे होतील. अविवाहितांचे विवाह ठरतील.

नोव्हेंबर/डिसेंबर :- नवीन ओळखी होतील. तसेच, वाहन चालविताना सावकाश चालावा. एखादी गुप्त बातमी समजेल.

**उपासना :- श्री मारुतीची उपासना करावी.**

**कुंभ**

## यशदायी कालखंड, साडेसातीची तीव्रता कमी

आपण मागील जानेवारी २०२३ ते मार्च २०२५ या कालखंडात अतिशय साडेसातीचा त्रास सहन केला. मात्र आता, आपली संपली आहे या भ्रमात राहू नका. शनी महाराजांना बेसावध राहिलेले अजिबात आवडत नाही. त्यामुळे सतत सावधान..! ज्यांची मागील वर्षापासून लग्न खोळंबली आहेत. निर्णय घेताना द्विधा मनस्थिती होते आहे अशा सर्वच लग्नाळू वधू/वरांचे विवाह ठरतील व ते यशस्वी होतील. या वर्षात नवविवाहितांचे विवाह ठरतील आणि नवविवाहितांना नवीन आनंदाची बातमी समजेल. सुशिक्षित बेरोजगारांना नोकरी लागेल. या मिळोलेल्या संधीचा त्यांनी जरूर फायदा घ्यावा. कोर्ट-केचरीच्या कामात यश मिळेल. तसेच त्यामध्ये काही तडजोडी केल्या असल्यास त्या योग्य ठरतील. आपला पाल्य जर इ. १० वी किंवा इ. १२ वीला असेल तर त्याला चांगले यश मिळेल. त्यांच्या संदर्भात घेतलेले निर्णय सर्व योग्य राहतील. नोकरदारांना हा कालखंड अतिशय प्रगतीवर नेणारा जाईल. तसेच व्यावसायिकांना सुद्धा आपल्या व्यवसायामध्ये नवीन कल्पना सुचतील व आपला व्यवसाय जोरात राहील. राजकारणी/कलाकार यांना हा कालखंड अतिशय चांगला आहे. नवीन कामे मिळतील व त्याला प्रसिद्धी मिळेल. नोकरीत वरिष्ठ खुश राहतील. उच्च शिक्षणासाठी परदेशी जाण्याचा प्रयत्न करीत असल्यास त्यात यश आहे.

जानेवारी/फेब्रुवारी २०२५ :- महत्वाचे निर्णय घेताना जपून घ्यावेत अन्यथा चुकण्याची शक्यता. याचा परिणाम दीर्घकाळापर्यंत जाणवेल.

मार्च/एप्रिल :- उष्णतेचे विकार बळकण्याची शक्यता. शेजाऱ्यांशी वागताना अतिशय सावधपणे वागावे. अन्यथा भांडणे होण्याची शक्यता.

मे/जून :- या दोनही महिन्यात आपले संततीविषयक सर्व प्रश्न मार्गी लागतील. ते निर्णय योग्य ठरतील. शिक्षण/विवाह यासंदर्भात निर्णय योग्य राहील.

जुलै/ऑगस्ट :- नोकरदारांची बदली होईल व त्याठिकाणी कामाचा ताण जाणवेल. तसेच अचानक धनलाभाचे योग आहेत.

सप्टेंबर/ऑक्टोबर :- आपल्या झालेल्या जीर्ण आजारावर योग्य डॉक्टर भेटतील. तसेच नोकरीत प्रमोशन मिळेल. वरिष्ठ खुश राहतील.

नोव्हेंबर/डिसेंबर :- नवीन ओळखी होतील व त्याचा उपयोग नोकरी व्यवसायामध्ये होईल. शेअर्समध्ये फायदा होईल.

**उपासना :- श्री हनुमानचालीसा वाचणे.**

**मीन**

## साडेसाती..अखंड सावधान..!

आपला स्वभाव मुळी सात्विक वृत्तीचा...पण या वर्षात मात्र आपल्याला एकंदरीतच सावधानतेचा इशारा आहे. याला कारण साडेसाती. नवीन नोकरी/व्यवसायात पाऊल टाकताना आपण अत्यंत सावधपणे टाकावे. जेणेकरून आपली फसवणूक होणार नाही व नंतर मनःस्ताप नवीन लग्न ठरविताना नियोजित वधू-वरांनी स्वतःच्या मतानुसारच निर्णय घ्यावेत. आपल्या जवळच्या कोणत्याही नातेवाईकावर फार भरवसा ठेवू नये. सुशिक्षित बेरोजगारांनी प्रामाणिकपणे कष्ट करावेत. या कालखंडात आपल्याला पैसे कमी व मेहनत जास्त असे सूत्र ठेवले तरच आपला निभाव लागेल. तसेच, या कालखंडात घेतलेली मेहनत मोठी गुंतवणूकच आहे. हे सूत्र लक्षात ठेवा. तसेच नवविवाहितांनी बोलताना, वागताना मोठा संयम ठेवावा. संयम सुटण्याचे सारखे प्रसंग येतील. पण आपण संयम ठेवावा. तसेच, स्थावर व मालमत्तेच्या बाबतीत खरेदी/विक्री करताना अत्यंत सावधानता बाळगावी. नाहीतर, आपले व्यवहार लांबणीवर पडतील. तसेच पैसे अडकतील. राजकारणी व्यक्तींना विरोधाला तोंड द्यावे लागेल व जनमत विरूद्ध जाईल. तसेच कलाकारांना सद्धा हाता-तोंडाशी आलेला घास निघून जाईल. एकंदरीतच यावर्षात प्रत्येक पाऊलावर सावध रहावे.

जानेवारी/फेब्रुवारी २०२५ :- स्थावर इस्टेटीचे कामे मार्गी लागतील. समाजात नवीन ओळखी होतील. अनपेक्षित प्रवासाचे योग.

मार्च/एप्रिल :- बोलताना संयम आवश्यक. नाहीतर टोकाची भांडणे होण्याची शक्यता. महत्वाची गुप्त बातमी समजेल.

मे/जून :- नोकरी/व्यवसायात नवीन कल्पना सुचतील. तसेच, लेखक व प्रकाशकांना हा कालखंड अतिशय छान आहे.

जुलै/ऑगस्ट :- हे दोन महिने आपले अतिशय मानसिक कोंडी करणारे आहेत. या २ महिन्यात अजिबात तोल जाऊ देऊ नको.

सप्टेंबर/ऑक्टोबर :- वाहन चालविताना अतिशय सावकाश चालवा. तसेच, या महिन्यात संततीविषयक बरेच प्रश्न मार्गी लागतील. परदेशी जाण्याचा प्रयत्न करीत असल्यास त्यामध्ये यश मिळेल.

नोव्हेंबर/डिसेंबर :- नोकरदारांची बदली होण्याची शक्यता किंवा जणूकामाचा अतिरिक्त ताण. एखाद्या धार्मिक स्थळी भेट देण्याचे योग.

**उपासना :- श्री दत्तात्रयांची, श्री हनुमानाची उपासना करावी.**

**- संजय कुलकर्णी**, 'दुर्गाप्रसाद', सुरभी कॉलनी, भुतकरवाडी,
सावेडी रोड, नगर, मो. ७५८८०२१६६६

# सेंद्रिय शेतीच्या ओढीने...

**सध्या लोकांना पोषक, आरोग्यदायी खायचं आहे. म्हणूनच सेंद्रिय पद्धतीने पिकवलेल्या फळं आणि भाज्यांना मागणी वाढते आहे. नोकऱ्यांची कमतरता असणाऱ्या काळात सेंद्रिय शेती हा उत्पन्नाचा चांगला मार्ग बनला आहे. कर्नाटकच्या अमोघ जगतापनेही एमबीए केल्यानंतर सेंद्रिय शेती करायला सुरुवात केली. त्याच्या भरारीविषयी...**

अचिव्हर

इंजिनिअरींग, एमबीए केलेले अनेक तरुण शेतीकडे वळत आहेत. आयटी किंवा कॉर्पोरेट क्षेत्रातल्या धकाधकीपेक्षा त्यांना नैसर्गिक वातावरणात शेती करणं आवडू लागलं आहे. कर्नाटकचा अमोघ जगताप अशाच काही तरुणांपैकी एक. अमोघला लहानपणापासूनच शेतीची ओढ लागली. शहरापासून दूर, निवांत ठिकाणी त्याच्या वडिलांनी फार्महाउस विकत घेतलं होतं. २० एकर परिसरात पसरलेल्या या फार्म हाउसच्या आसपास शेतीची चांगली संधी असल्याचं अमोघने हेरलं. त्याने बंगळूरूतून एमबीए केलं. यानंतर कॉर्पोरेट क्षेत्रात जायचं की शेतीकडे वळायचं याचा निर्णय त्याला घ्यायचा होता. कॉर्पोरेट ऑफिसच्या कार्यालयात राबण्यापेक्षा जमीन कसायचा निर्णय त्याने घेतला आणि २०१६ मध्ये सेंद्रिय शेतीची सुरूवात केली. तो विविध धान्यं, डाळी, फळं, भाज्यांचं पीक घेतो. या माध्यमातून निसर्गाच्या जवळ जाण्याचा त्याचा प्रयत्न आहे. तो शेतीतून वर्षाला ७ ते १० लाखांपेक्षा जास्त उत्पन्न घेतो. इतकंच नाही, तर तो पशुपालन आणि कुक्कुटपालनाचा व्यवसायही करतो.

यासाठी त्याने विविध संकल्पना लढवल्या आहेत. एकाच हंगामात जमिनीच्या एकाच तुकड्यावर दोन प्रकारची पिकं घेण्याचा प्रयोग त्याने केला. तो यशस्वी ठरला. कर्नाटकमधल्या मल्लावल्लीतल्या त्याच्या शेतात नारळाची ८०० झाडं आहेत. रक्तचंदनाची आणि साध्या चंदनाची प्रत्येकी एक हजार झाडं आहेत. ठिबक सिंचनाच्या माध्यमातून तो पाण्याची बचत करतो.



विक्रीच्या बाबतीतही त्याने नव्या पद्धती आणल्या आहेत. मध्यस्थांना त्याने बाजूला सारलं आहे. आपली उत्पादनं थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याचा त्याचा प्रयत्न असतो. ग्रीन व्हॅली नावाचं दुकान त्याने सुरू केलं आहे. मालावल्ली-म्हैसूरला जोडणाऱ्या रस्त्यावर त्याचं हे दुकान आहे. भाज्या, फळं, धान्यांसोबतच मध, गायी-म्हशीचं दूध आणि इतर दुग्धजन्य उत्पादनंही तो विकतो. मुख्य रस्त्यावर शेतकऱ्यांचा बाजार भरवतो. इथे सेंद्रिय शेती करणारे इतर शेतकरीही येतात. आपल्या उत्पादनांची विक्री करण्याची संधी त्यांना मिळते. या निमित्ताने तो अशा शेतकऱ्यांना प्रोत्साहन देतो. इतर शेतकऱ्यांच्या उत्पदनांना योग्य भाव मिळावा असाही त्यांचा प्रयत्न असतो.

# जोश

## फंडू एसएमएस

* तुझे महसूस करने का हर अहसास अजीब है, तू पास है तो पास है, जब दूर है तो भी पास है।

* हमें कहां मालूम था की इश्क होता क्या है, बस एक 'तुम' मिले और जिंदगी मोहब्बत बन गई।

* मेरे 'शब्दों' को इतने ध्यान से ना पढो दोस्तों, कुछ याद रह गया तो मुझे भूल नहीं पाओगे।

# सुपर ट्रेंडी शर्ट्स

फॅशन पॅशन

मित्रांनो, एखादा छानसा शर्ट तुमचा लूक पटकन खुलवू शकतो. ऑफिस पार्टी असो, मीटिंग असो किंवा व्हॅलेंटाईन्स डे डेट असो शर्टचे काही ट्रेंडी पर्याय कोणत्याही ऑकेजनची शान ठरतात. टिपिकल प्लेन, स्ट्राईप्स किंवा चेक्सवाल्या शर्टपेक्षा काहीतरी वेगळं ट्राय करायचं असेल तर हे पर्याय खास तुमच्यासाठी आहेत.

* कलरब्लॉक्ड म्हणजे दोन रंगांचा सॉलिड शर्ट तुमच्याकडे असायला हवा. त्यातही व्हाईट आणि ग्रे कॉम्बिनेशन खूपच भारी दिसतं. उन्हाळा असो किंवा हिवाळा, पार्टी असो डेट... हा शर्ट कोणत्याही प्रसंगी शोभून दिसेल. अशा शर्ट तुमच्या वॉर्डरोबमध्ये असायलाच हवा.

* तुम्हाला प्रिंट्स आवडत असतील तर प्रिंटेड कॉटन शर्ट खरेदी करता येईल. डिसेंट प्रिंट्सचे शर्टही मिळतात. प्रिंटेड व्हाईट शर्ट खूपच खुलून दिसतो. असा शर्ट कोणत्याही रंगाच्या ट्राउझरवर घालता येईल.

* तुम्हाला जास्तच स्टायलिश दिसायचं असेल तर प्रिंट आणि स्ट्राईप्सचं कॉम्बिनेशन असणारा शर्ट कॅरी करता येईल. ब्लॅक अँड व्हाईट किंवा व्हाईट अँड ब्लू असं कॉम्बिनेशन तुम्ही करू शकता.

* ट्रॉपिकल प्रिंट्स आवडत असतील तर असे शर्ट्स घालता येतील. पांढऱ्या रंगाचा ब्लॉसम प्रिंट कॉटन शर्ट खरेदी करता येईल. हा शर्ट जीन्सवर खूप छान दिसेल. त्यासोबत स्नीकर्स घाला आणि कॅज्युअल दिसा.



* सौम्य फ्लोरल प्रिंटवाले शर्ट भाव खाऊन जातात. तुम्ही असे शर्ट घेऊ शकता. पांढऱ्या रंगावर फ्लोरल प्रिंट्स शोभून दिसतात. कॅज्युअल ऑकेजनसाठी जीन्सवर हा शर्ट घाला आणि ऑफिसला जाताना ट्राउझर कॅरी करा.

* जिओमेट्रिक प्रिंट्स इन आहेत. अशा प्रिंटचा पिवळ्या रंगाचा शर्ट शोभून दिसेल. ब्रंच किंवा कॉफी डेटसाठी हा शर्ट परफेक्ट आहे.

* पार्टी वेअर प्रिंटेड श[र्ट] तुमच्याकडे असायला हवा. नेव[्ही] ब्लू प्रिंटेड शर्ट खास दिसेल.

* एखादा चेक्सवाला [शर्ट] घ्यायला हरकत नाही. थोडे मो[ठ्या] आकाराचे चेक्स शोभून दिसती[ल.] नेव्ही ब्लू चेक्स शर्ट हटके दिसेल.

# दाढीधारी बनण्यासाठी

ग्रुमिंग

मुलांचा चिकना चुपडा, तुळतुळीत दाढी केलेला चेहरा मुलींना आवडेनासा झाला आहे म्हणे... म्हणूनच का सध्या सगळे गब्रू जवान दाढीधारी झाले आहेत? पण मित्रांनो, हा रफ अँड टफ लूक तुम्हाला खूप छान दिसतो बरं का... गरज आहे ती दाढीच्या जपणुकीची. काही टिप्स फॉलो करा आणि बघा, तुम्हीही रितेश, ऋतिक, अजय, सिद्धार्थ, वरुण, रणवीरच्या पंक्तीत आरामात जाऊन बसाल. अगदी प्राचीन काळापासून दाढी हे पुरुषांच्या शक्तीचं प्रतीक मानलं गेलं आहे. दाट आणि मजबूत दाढी पुरुषांची पोलादी ताकद दर्शवतं. म्हणूनच दाढी राखणं हे अनेक युवकांचं स्वप्न असतं. त्यासाठी ते प्रयत्नांची पराकाष्ठा करतात. पण लक्षात घ्या, दाढी वाढण्याची गती आणि मजबुती वय आणि जेनिटिकवर अवलंबून असते. * दाढी लवकर वाढावी यासाठी आहारात प्रोटीनयुक्त पदार्थांचं सेवन वाढवावं. प्रोटीन्सअभावी दाढी खुरटी राहते. * दाढी वाढवण्याच्या प्रयत्नात असाल तर पुरेशी झोप घ्या. * दिवसातून आठ ग्लास पाणी प्यायलाच हवं. यामुळेही दाढी लवकर वाढेल.



* केस गळू नयेत यासाठी तणावमुक्त राहण्याचा प्रयत्न करा.
* वेळोवेळी चेहऱ्यावरील मृत त्वचेचा थर दूर करत राहिल्यास दाढी वाढण्यास मदत होते. त्यामुळे पुरुषांसाठी असणाऱ्या एक्सफोलिएट मास्कचा वापर करेल. नवीन केस येण्यास मदत होईल. * दाढी वाढवण्यासाठी संयम राखायला हवा. एकदा दाढी चांगली वाढली की मधल्या गॅप्स भरल्या जातात आणि हवा तसा लूक मिळतो. * एकदा दाढी वाढली की तिची निगा राखा. यासाठी चांगल्या दर्जाच्या कंडिशनरचा वापर करा. यासाठी एरंडेल तेल सर्वोत्तम समजलं जातं. तुम्ही खोबरेल तेल, ऑलिव्ह ऑईल, पेपरमिंट ऑईलने मसाज करा. यामुळेही योग्य पोषण मिळेल आणि दाढी चांगली दिसेल. * दाढी चांगली राहण्यासाठी आहारात व्हिटॅमिन बी १, बी ६, बी १२ युक्त पदार्थांचा वापर करावा. यामुळे केसांचं उत्तम पोषण होईल.

# नातं योग्य आहे का?

मॅच मेकिंग

मी आर्थिकदृष्ट्या सक्षम २७ वर्षांची तरूणी असून पाच वर्षांनी लहान असलेल्या मुलाच्या प्रेमात पडले आहे. आम्ही शेजारी आणि बालपणीचे मित्र आहोत. आमच्या कुटुंबियांना हे नातं मान्य होणार नाही, याची मला कल्पना असली तरी या नात्याला एक संधी द्यावी, असं मला वाटतं. बहुतेक त्यालाही मी आवडते. दुसरं म्हणजे तो फक्त २२ वर्षांचा असून मास्टर्स अभ्यासक्रमाची तयारी करत आहे. या नात्याचं मर्म त्याला कळेल का? वयातल्या अंतरामुळे भविष्यात काही समस्या निर्माण होतील का? मी खूप गोंधळून गेले आहे.



**उत्तर** :बराच काळ एकत्र घालवल्यानंतर एखाद्याबद्दल आकर्षण वाटणं स्वाभाविक आहे. पण हे फक्त आकर्षण आहे का प्रेम, हे जाणून घे. त्यातच त्याला तू आवडतेस किंवा नाही याबद्दल निश्चित असं काहीच सांगता येत नाही. त्यामुळे याबाबत स्पष्टपणे बोल. त्याला आत्ता नातेसंबधात अडकायचं आहे का, हे जाणून घे. अवघा २२ वर्षांचा हा मुलगा आयुष्यात स्थिरस्थावर झालेला नाही. त्यामुळे तू एखाद्या समुपदेशकाची मदत घे. भविष्याचा विचार सध्या तरी करू नकोस. सद्यस्थितीतून मार्ग काढण्याचा प्रयत्न कर. नात्यात समर्पण आणि विश्वासाची गरज असते. वयातल्या अंतरावर मात करून अनेकजण सुखी संसार करत आहेत. पण आधी या मुलाच्या मनातलं जाणून घे आणि मगच पुढे जा.

# पास्त्याला द्या ट्विस्ट

झटपट रेसिपी

दोस्तांनो, तुम्हाला पास्ता आवडत असेल. भरपूर चीज घातलेला, रेड किंवा व्हाईट सॉसमधला पास्ता बघितला की तोंडाला पाणी सुटतं. याच पास्त्याला आपण देसी ट्विस्ट देऊ शकतो. हा पास्ता करायची पद्धत अगदी सोपी आहे. चला तर मग, या इंडियन स्टाईल पास्ताची रेसिपी जाणून घेऊ या.

**साहित्य :** एक कप पास्ता, चार कप पाणी, चिरलेला कांदा, टोमॅटो, चमचाभर आलं-लसूण पेस्ट, दोन हिरव्या मिरच्या चिरून घ्या. लाल तिखट, गरम मसाला, एक चमचा मैदा, तीन चमचे दूध, ऑलिव्ह ऑईल(नेहमीचं तेलही चालेल), मीठ, चिरलेली कोथिंबिर


**कृती:** भांड्यात पाणी उकळून घ्या. त्यात थोडं मीठ आणि तीन ते चार थेंब तेल घाला. पाणी उकळल्यावर त्यात पास्ता घाला. सहा ते आठ मिनिटं शिजवून घ्या. पाणी काढून पास्ता बाजूला ठेवा. कढईत दोन चमचे तेल गरम करा. कांदा आणि हिरव्या मिरच्या परतून घ्या. त्यात आलं लसूण पेस्ट घालून हलवा. यानंतर टोमॅटो घालून शिजवून घ्या. टोमॅटो मऊ शिजले की त्यात मैदा घाला. परतून घ्या. यात दूध, चवीनुसार लाल तिखट, गरम मसाला आणि मीठ घाला. दूध नको असेल तर त्याऐवजी पास्ता शिजवलेलं पाणी घालता येईल. आता सर्व पदार्थ एकजीव करा. मीठ आणि तिखटाचं प्रमाण थोडं जास्त ठेवा. कारण आपल्याला अजून पास्ता घालायचा आहे. या मसाल्यात पास्ता घालून नीट हलवून घ्या. पास्त्याला नीट मसाला लागला पाहिजे. गॅस बंद करा. वरून कोथिंबिर घाला. गरमागरम खा.



## स्मार्ट टिप्स

### स्मार्टफोनची मेमरी फुल झाली तर...


आपल्या स्मार्टफोनमध्ये बरंच काही साठलेलं असतं. त्यामुळे मेमरी फुल होऊन जाते. अशा वेळी काय करायचं? पाहू या.




* अनवॉन्टेड फाईल्स डिलिट करा.
* नको असलेले फोटो आणि व्हिडिओ काढून टाका. व्हॉट्स ॲपमधला ऑटो डाउनलोडचा पर्याय काढून टाका.
* नको असलेली ॲप्स डिलिट करा.
* मोबाईलमध्ये कॅचे साठून राहतात. ते काढून टाका.

## हाऊ टू

### आयफोनचा पासवर्ड विसरलाय?




आयफोनचा पासवर्ड विसरल्यानंतर आपली भंबेरी उडू शकते. हा पासवर्ड मिळवण्यासाठी ॲपलच्या सर्व्हिस सेंटरला भेट द्यावी लागते. अर्थात काही स्टेप्स फॉलो करून आयफोन अनलॉक करता येईल. मात्र यातला डाटा डिलिट होईल.

* सर्वात आधी मॅकबुक किंवा विंडोज पीसीमध्ये आय ट्यून्स ॲप डाउनलोड करून ते ओपन करा.
* आता आयफोन फोर्स रिस्टार्ट करायचा आहे. यासाठी व्हॉल्यूम आणि पॉवर बटण एकत्र दाबून सोडावं लागेल.
* यानंतर तुम्हाला रिस्टोअर किंवा अपडेटचा पर्याय दिसेल. यापैकी रिस्टोअर पर्याय निवडा. यानंतर आयट्यून तुमच्या फोनसाठी सॉफ्टवेअर डाउनलोड करेल. यासाठी साधारण १५ मिनिटं लागतील. यानंतर आयफोन 'रिकव्हरी मोड'मधून बाहेर पडेल.

## व्हॉट्स न्यू?

### योगासने शिका ॲपवर!

फिटनेससाठी हजारो ॲप्स उपलब्ध आहेत. त्यावरून वर्कआऊटसाठी वेगवेगळे व्यायामप्रकार शिकता येतात. आता योगासनांसाठी सुद्धा अशी ॲप्स आली आहेत. या ॲप्सवरून तज्ज्ञांच्या मदतीने योगासनं शिकता येतील. यातील काही ॲप्स विनामूल्य आहेत तर काही ॲप्सवर अत्यल्प फी भरावी लागते. सध्या ॲप्सवरून योगासनं शिकण्याचं प्रमाण वाढत आहे. त्यामुळे अशी ॲप्स तयार होण्याचं प्रमाणही वाढत आहे. पण कोणत्याही ॲपवरून योगासनं शिकताना आधी खातरजमा करून घ्या. ॲपवरील माहिती गुगल किंवा जाणकारांकडून क्रॉसचेक करून घ्या. आपल्या वेळेनुसार योगासनं शिकता येतात हा या ॲपचा महत्त्वाचा फायदा आहे. अनेकांना व्यस्त दिनचर्येमुळे योगासनांच्या क्लासला जाता येत नाही. अशांसाठी ही ॲप्स महत्त्वपूर्ण ठरतात.



## सोशल मिडिया

### असं करा गुगल सर्च...

दोस्तांनो, माहिती कोणतीही असो, ती शोधण्यासाठी आता पुस्तक उघडण्याची गरज राहिलेली नाही. गुगलने आपल्या सगळ्या समस्या सोडवल्या आहेत पण गुगल सर्च करताना काही अडचणी येऊ शकतात. या टिप्सनी तुम्ही झटपट गुगल सर्च करू शकता. * स्पेलिंग सर्च करायचं असेल तर त्या शब्दाशी संबंधित दोन-चार अक्षरं लिहा. या अक्षरांच्या मध्ये '&' किंवा 'or' हा शब्द टाकून सर्च करा. स्पेलिंग लवकर सापडेल. * वेबसाईट सर्च करताना साईटशी संबंधित माहिती लिहा. मध्ये 'ब' चिन्ह टाका. साईट्स मिळतील. * एखाद्या साईटवरचा ठराविक लेख वाचायला असेल तर साईट ॲड्रेस टाकून लेखाचा विषय टाका. लेख लवकर सापडेल. * टायटल किंवा यूआरएल शोधायचं असेल तर **intitle:** लिहून तो शब्द लिहा. * एकाच प्रकारच्या वेबसाईट्स शोधायच्या असतील तर **related:** टाकून ती साईट टाका.

# अनुभवा सर्फिंगचा थरार

भटकंती

आपल्या भारतातही वॉटर स्पोर्टस बरंच लोकप्रिय होत आहे. स्कुबा डायव्हिंग, रिव्हर राफ्टींग, सर्फिंग, मोटर बोटची सफर असे बरेच पर्याय उपलब्ध आहेत. वॉटर स्पोर्टसचा थरार वेगळाच असतो. तुम्हाला सर्फिंग करावंसं वाटत असेल तर भारतातल्या विविध समुद्रकिनाऱ्यांना भेटी देता येतील. सर्फिंगचे हे काही देसी पर्याय...


* वॉटर स्पोर्टसचा भन्नाट अनुभव घेण्यासाठी पुद्दुचेरीला भेट द्या. इथले स्वच्छ आणि सुंदर समुद्रकिनारे तुम्हाला आकर्षित करतील. इथल्या समुद्रातल्या लाटांवर स्वार होऊन मस्तपैकी सर्फिंग करता येईल. इथला सेरेनिटी समुद्रकिनरा सर्फिंगसाठी प्रसिद्ध आहे. तसंच अन्य आकर्षक समुद्रकिनारेही आहेत.

* केरळ हे भारतातल्या सुंदर राज्यांपैकी एक. केरळचा कोवलम समुद्रकिनारा खूप प्रसिद्ध आहे. इथेही सागराच्या उंच उंच लाटांवर स्वार होऊन सर्फिंगचा आनंद लुटता येईल.

* कर्नाटकमधल्या गोकर्णचा समुद्रकिनारा खास आहे. हा समुद्रकिनारा पर्यटकांचं खास आकर्षण ठरतो. हा समुद्रकिनाराही सर्फिंगसाठी उत्तम मानला जातो. इथे बरेच पर्यटक सर्फिंगसाठी येतात. इथल्या महाबळेश्वर मंदिराला भेट दिल्यानंतर लोक गोकर्णच्या समुद्रकिनाऱ्यावर येऊन सर्फिंगचा थरार अनुभवतात. तुम्हीही अशी एखादी सहल ठरवू शकता.

* गोवा हे पर्यटकांच्या आकर्षणाचं केंद्र आहे. देशाविदेशातले पर्यटक गोव्याला भेट देत असतात. इथले शांत आणि सुंदर समुद्रकिनारे पर्यटकांचं मन मोहवून टाकतात. इथला निसर्ग प्रेमात पाडतो. गोव्यातही सर्फिंगची संधी मिळते. इथे बरेच सर्फिंग पॉईंट्स आहेत. इथल्या समुद्रकिनाऱ्यांवर निवांत सर्फिंग करता येईल.

यंदा पर्यटनाच्या काही वेगळ्या वाटा निवडून आनंद द्विगुणित करता येईल.



# इंजिनिअरिंग इन रबर टेक्नॉलॉजी


वेगळ्या वाटा

दोस्तांनो, इंजिनिअरींग म्हटलं की ठराविक शाखांचा विचार मनात येतो. सॉफ्टवेअर, कॉम्प्युटर, सिव्हिल, ऑटोमोबाईल या इंजिनिअरींगच्या कॉमन शाखा आहेत. सहसा कुणी या पर्यायांपलीकडे बघत नाही. पण इंजिनिअरींगचं क्षेत्र प्रचंड मोठं आहे. सरधोपट शाखा निवडायच्या नसतील तर रबर टेक्नॉलॉजीचा पर्याय तुमच्याकडे आहे.

* रबराचा वापर प्रत्येक क्षेत्रात केला जातो. रबर टेक्नॉलॉजी ही इंजिनिअरींगची शाखा असेल असा विचार आपल्या मनात सहसा डोकावत नाही. पण या क्षेत्रात तुम्ही उत्तम भविष्य घडवू शकता.

* रबर टेक्नॉलॉजीत रबराच्या विविध वस्तू घडवल्या जातात. नैसर्गिक रबरापासून लेटेक्स आणि सिंथेटिक रबरवर प्रक्रिया केली जाते. या रबरांपासून वेगवेगळी उत्पादनं बनवली जातात.

* बारावीत फिजिक्स, केमिस्ट्री आणि गणित हे विषय घेऊन रबर टेक्नॉलॉजी निवडता येईल. रबर टेक्नॉलॉजीशी संबंधित अनेक अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. बीई, बीटेक, डिप्लोमा यापैकी कोणताही पर्याय तुम्हाला निवडता येईल.



* हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर टेस्टिंग टेक्नॉलॉजिस्ट, टेक्निशियन, प्रोडक्शन इंजिनिअर, पॉलिमर स्पेशलिस्ट, मटेरियल टेक्नॉलॉजिस्ट अशा विविध पदांवर काम करता येईल.

* रबर क्षेत्रासोबतच ऑटोमोबाईल क्षेत्रातही तुम्ही काम करू शकता. सरकारी क्षेत्रात नोकरीच्या अनेक संधी आहेत.

* गुजरात टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी, गांधीनगर, इंडियन रबर इन्स्टीट्यूट कोलकाता, हिंदुस्तान कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, चेन्नई, आयआयटी खरगपूर या ठिकाणी अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

# स्मार्ट विद्युत मीटरची सक्ती म्हणजे सामान्य जनतेचे 'आर्थिक शोषण'

## विद्युत महावितरण विरोधात आम आदमी पार्टी जनआंदोलन उभारणार


महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (एमएसईडीसीएल) द्वारे संपूर्ण महाराष्ट्रात स्मार्ट विद्युत मीटर लावण्यास करण्यात आलेल्या सक्तीला आम आदमी पार्टीच्या वतीने कायमचा विरोध दर्शविण्यात आला आहे. सदरचा निर्णय रद्द करण्याच्या मागणीचे निवेदन आपच्या वतीने जिल्हाधिकारी व विद्युत महावितरणचे अधीक्षक अभियंता रमेश पवार यांना देण्यात आले.

नगर – महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (एमएसईडीसीएल) द्वारे संपूर्ण महाराष्ट्रात स्मार्ट विद्युत मीटर लावण्यास करण्यात आलेल्या सक्तीला आम आदमी पार्टीच्या वतीने कायमचा विरोध दर्शविण्यात आला आहे. सदरचा निर्णय रद्द करण्याच्या मागणीचे निवेदन आपच्या वतीने जिल्हाधिकारी व विद्युत महावितरणचे अधीक्षक अभियंता रमेश पवार यांना देण्यात आले.

याप्रसंगी शहर जिल्हाध्यक्ष भरत खाकाळ, महिला आघाडीच्या अध्यक्षा ॲड. विद्या शिंदे, उपाध्यक्ष अंबादास जाधव, महासचिव दिलीप घुले, व्यापारी आघाडीचे अध्यक्ष राजेंद्र सामल, मीडिया सहसंयोजक गौतम कुलकर्णी, युवा आघाडी उपाध्यक्ष विजय लोंढे, ऑफिस इन्चार्ज नामदेव ढाकणे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

स्मार्ट विद्युत मीटरची करण्यात आलेली सक्ती राज्यातील सर्वसामान्य जनतेचे आर्थिक शोषण करण्याचा घाट शासनाने घातला असल्याचा आरोप आपचे शहर जिल्हाध्यक्ष भरत खाकाळ यांनी केला आहे. खाकाळ म्हणाले की, स्मार्ट विद्युत मीटरच्या निर्मिती व जोडण्याची किंमत ६ हजार रुपये प्रति मीटर अपेक्षित आहे. मात्र या मीटरच्या किमतीत दुप्पट वाढ करून १२ हजार रुपये प्रति मीटर दराने नागरिकांकडून वसुल करण्यासाठीचे कंत्राट खाजगी कंपन्यांना देण्यात आले आहे. भांडवलवादी कंपन्यांना फायदा व्हावा, या हेतूने शासनाने ही योजना आखली आहे. ग्राहकांना प्रीपेड स्वरूपात विद्युत बिलाचे पैसे भरून ठेवण्यास भाग पाडून, महाराष्ट्राच्या जनतेचे आर्थिक शोषण करू पाहणाऱ्या बोगस विद्युत स्मार्ट मीटर योजनेला आम आदमी पार्टी कायम विरोध राहणार असल्याचे त्यांनी म्हंटले आहे.

खाकाळ यांनी विद्युत महावितरणचे अधीक्षक अभियंता यांना शहरात जनतेला पूर्ण माहिती न देता स्मार्ट मीटर बसविण्यात येत असल्याचे सांगितले. सध्या दिल्लीगेट, तेलीखुंट या परिसरात काही ठिकाणी मिटर लावले आहेत आणि संपूर्ण शहरात लावणार आहे या पुढे विद्युत स्मार्ट मीटर हे शहरात लावू नये, यावर अधीक्षक अभियंता यांनी ते ऐच्छिक स्वरूपाचे असल्याचे स्पष्ट करुन सांगितले. जर ते ऐच्छिक आहे आणि पूर्ण माहिती न देता लावले जात आहे, तर पुढे जाऊन गोरगरीब जनतेचे आर्थिक शोषण झाले तर याला जबाबदार कोण? असल्याचा प्रश्न उपस्थित केला. याबाबत अधीक्षक अभियंता यानी वरिष्ठ पातळीवर कळविण्याचे उत्तर दिले.

ॲड. विद्या शिंदे यांनी लोकसभा आणि विधान सभेच्या अगोदर स्मार्ट मीटर लावले जाणार नसल्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र निवडणूक संपताच हे मीटर लावून जनतेची लूट करण्याचा विद्युत महावितरणचा डाव असल्याचा आरोप केला. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने शहरात स्मार्ट विद्युत मीटर बसविण्याचे थांबवले नाही, तर जनआंदोलन उभे करणार असल्याचा इशारा आम आदमी पार्टीच्या वतीने देण्यात आला आहे.


अहमदनगर पहिली मंडळी, सी. एन. आय. हातमपुरा येथील चर्चमध्ये ख्रिस्तजन्मोत्सव सप्ताह कार्यक्रम अंतर्गत कॅण्डल लाईट सर्व्हस म्हणजेच मेणबत्यांचा सण साजरा करण्यात आला. (छाया – यतीन कांबळे)

# ख्रिस्त जन्मोत्सवानिमित्त शहरात कॅण्डल फेरी

नगर – अहमदनगर पहिली मंडळी, सी. एन. आय. हातमपुरा येथील असलेल्या चर्चमध्ये ख्रिस्तजन्मोत्सव सप्ताह कार्यक्रम अंतर्गत कॅण्डल लाईल सर्व्हस म्हणजेच मेणबत्यांचा सण साजरा करण्यात आला. या प्रसंगी चर्चमध्ये विशेष उपासना घेण्यात आली. चर्चचे धर्मगुरु रेव्ह. तुपसुंदरे पाळक यांनी देवाच्या वचनातून उपस्थित भक्तगणांना प्रवचन केले.

येशूने म्हटले मी जगाचा प्रकाश आहे. या प्रकाशाची सुवार्ता संपूर्ण सृष्टीस कळावी याकरीता सभासदांची फेरी काढण्यात आली. चर्चपासून हातमपुरा चौक ते एम.जी. रोड मार्गे जुना बाजार व परत चर्च या मार्गावर फेरीचे नियोजन करण्यात आले. या फेरीमध्ये लहान थोर सभासदांनी हातात मेणबत्ती धरुन धार्मीक गीतांद्वारे आणि घोषणाद्वारे ख्रिस्तजन्माची सुवार्ता नगरमध्ये केली. या प्रसंगी लहान लेकरे, महिला मंडळ, तरुण संघ आणि आबालवृध्द हयांनी उत्साहाने सहभाग घेतला. चर्चमध्ये या फेरीची सांगता करतांना चर्चचे धर्मगुरु यांनी प्रार्थना केली आणि आशीर्वाद दिला आणि पुन्हा एकदा ख्रिस्तजन्माची घोषणा देउन फेरीची सांगता करण्यात आली.

हे सर्व कार्यक्रम यशस्वी पार पाडण्याकरीता चर्चचे धर्मगुरु रेव्ह अभिजीत तुपसुदरे, सचिव सतिश मिसाळ, उपसचिव प्रितम जाधव, खजिनदार डॉ. संजय लाड, उपखजिनदार सॅम्युएल बोर्डे, कार्यकम समिती अध्यक्ष प्रसन्ना शिंदे, प्रा. विनीत गायकवाड, रविद्रं लोंढे, सुनित ढगे, अमोल लोंढे, कुमार हर्षल पाटोळे, सौ. शोभना गायकवाड, सौ. वंदना शिंदे, सौ. कांदबरी सुर्यवंशी, सौ. शशिकला साळुंके, श्रीमती स्नेहल साळवे हया कमिटी सदस्यांनी परिश्रम घेतले तसेच कौतुकास्पद परिश्रम चर्चचा तरुण संघाने घेतले. महिला मंडळ, चर्च सभासद यांचे सहकार्य लाभले.

# नव्या वर्षात प्रलंबित सर्व योजना, प्रकल्पांना गती देऊन ते कार्यरत करणार

## नाट्यगृह, रुग्णालय, उद्याने, रस्ते विकसित करून महानगरपालिका चांगल्या सुविधा देणार; उत्पन्नाचे स्त्रोत वाढविणार : आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे

नगर – नव्या वर्षात महानगरपालिकेकडून अधिक चांगल्या सेवा, सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू. येत्या वर्षात सध्या सुरू असलेल्या प्रकल्प, योजनांना गती देऊन नाट्यगृह, क्रीडा संकुले, अद्ययावत रुग्णालय, ई बस सेवा, सीना नदी सुशोभीकरण आदी प्रमुख योजना व प्रगतीपथावर असलेली रस्त्यांची कामे पूर्ण करण्याचा निर्धार महानगरपालिकेने केला असल्याचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी म्हटले आहे.

नवीन वर्षात पदार्पण करताना आयुक्त यशवंत डांगे यांनी आगामी वर्षात राबवायचा योजना, शहरातील महत्त्वाचे प्रश्न सोडवण्यासाठी आवश्यक उपाययोजना, दैनंदिन सेवा व सुविधा बळकट करण्यासाठी नियोजन, स्वच्छता व कचरा संकलन सेवा बळकट करुन स्वच्छ व सुंदर शहर संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी संकल्प केला आहे. सद्यस्थितीत शहरात राज्य सरकारने दिलेल्या व आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून उपलब्ध झालेल्या निधीतून सुमारे दीडशे रस्त्यांची कामे सुरू आहेत. ही सर्व कामे येत्या वर्षात पूर्ण करून नागरिकांना चांगले रस्ते उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे. नाट्यगृह, स्पोर्टस् कॉम्प्लेक्स, म्युझिकल फाऊंटन, सीना नदी परिसर सुशोभीकरण ही कामे प्रगतीपथावर आहेत. रुग्णालयाचे कामही अंतिम टप्प्यात आले आहे. ही कामे पूर्ण करून चांगल्या व दर्जेदार सुविधा, सेवा उपलब्ध करण्याचा मनपाचा मानस आहे.


विविध योजनांसंदर्भात चर्चा करताना मनपा आयुक्त यशवंत डांगे आणि अधिकारीवर्ग.

तसेच, अहिल्यानगर शहर स्वच्छ शहर म्हणून विकसित व्हावे, यासाठी दर शनिवारी स्वच्छता अभियान राबवण्यात येणार आहे. कचरा संकलन व्यवस्थेवर अधिक लक्ष केंद्रीत करून नागरिकांच्या घरी दररोज घंटागाडी जाईल, यासाठी नियोजन सुरू आहे. यासह माझी वसुंधरा अभियान ५.० व स्वच्छ सर्वेक्षण २०२५ प्रभावीपणे शहरात राबवण्यात येणार आहे. मागील वर्षीपेक्षा चांगले मानांकन मिळवण्यासाठी व माझी वसुंधरा अभियानात पुन्हा पारितोषिक मिळवण्यासाठी प्रयत्न करणार आहे. शहर अतिक्रमण मुक्त करण्यासाठी सातत्याने कारवाई सुरू राहणार आहे. शहराचे विद्रुपीकरण होऊ नये, यासाठी फ्लेक्स मुक्त शहर अभियान राबविण्यात येत आहे. शहरात वृक्ष गणना करणे, तसेच उद्याने विकसित करून नागरिकांना मनोरंजन व विरंगुळासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

मनपाच्या कर वसुलीला गती देऊन १०० टक्के वसुलीसाठी प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी विविध पथके तयार केली आहेत. या द्वारे वसुली, कारवाई केली जाणार आहे. अधिकृत नळ कनेक्शन तपासून ते बंद करण्यात येतील. उत्पन्नाचे स्त्रोत वाढवण्यासाठी नवीन व्यापारी संकुल उभारणे, प्रलंबित असलेले नेहरू मार्केट, प्रोफेसर कॉलनी चौक येथील व्यापारी संकुल नव्याने विकसित करणे, इतर संकुलांचा आढावा घेऊन दुरवस्था झालेल्या संकुलांचे नूतनीकरण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

नागरी सेवा बळकट करतानाच जन्म व मृत्यू दाखल्याचे काम अधिक सुरळीतपणे पार पडावे, नागरीकांना जलद व वेळेत दाखले मिळावेत, यासाठी उपाययोजना केल्या जात आहेत. आरोग्य सेवेतील त्रुटी दूर करून शहरात नव्याने उभारण्यात आलेली १२ आरोग्यवर्धीनी केंद्रे व महानगरपालिकेची प्राथमिक आरोग्य केंद्रात चांगल्या आरोग्य सुविधा मिळतील, यासाठी नियोजन करण्यात आले आहे. त्यासाठी महिन्यातून किमान एक वेळा प्रत्येक आरोग्य केंद्राची स्वतः तपासणी करणार आहे. महानगरपालिकेचे कामकाज दैनंदिन वेळेत सुरळीत सुरू राहावे, यासाठी कर्मचाऱ्यांना शिस्त लावून ते वेळेत कामावर हजर राहतील, यासाठी प्रत्येक विभागात अचानक तपासणी करून हजेरी घेतली जाणार आहे.

नागरीक व मनपा यांच्यात समन्वय वाढवून महानगरपालिकेच्या योजना, उपक्रम थेट नागरिकांपर्यंत पोहचवण्यासाठी, नागरीकांना प्रशासनाशी थेट संपर्क साधता यावा, मोबाईलवरून थेट तक्रार दखल करता यावी, यासाठी नव्याने सॉफ्टवेअर विकसित करण्यात येत आहे. व्हॉट्स ॲपच्या माध्यमातून ही सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. नागरिकांना अधिकाधिक चांगल्या सेवा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न येत्या वर्षात महानगरपालिका प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी करतील, असा विश्वास यशवंत डांगे यांनी व्यक्त केला आहे.

## सी. ए. परीक्षेत ऋषिकेश मुळे यांचे यश



नगर – इन्स्टिट्युट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या (ICAI) नोव्हेंबर २०२४ मध्ये झालेल्या सीए फायनल परीक्षेमध्ये अहिल्यानगर येथील ऋषिकेश मुळे हे उत्तीर्ण झाले. माणिकताई करंदीकर हायस्कूल मधील कर्मचारी सुनिल लक्ष्मण मुळे यांचे ते चिरंजीव आहेत.

ऋषिकेशचे दहावीपर्यंतचे शिक्षण श्री अंबिका विद्यालय, केडगाव तर बारावीचे शिक्षण रेसिडेन्शिअल ज्युनिअर कॉलेजमध्ये झाले. त्यांना सी.ए. पवनकुमार दरक यांचे मार्गदर्शन लाभले.

# वेटरला मोठ्याने आवाज दिल्याच्या कारणावरून दोघांना मारहाण

नगर – हॉटेलमध्ये जेवण केल्यानंतर पाण्यासाठी वेटरला मोठ्याने आवाज दिला या कारणावरून शेजारी बसलेल्या तरुणास राग आल्याने त्यांनी काचेची बाटली डोक्यात फोडून मारहाण केली ही घटना चितळे रोडवरील पिंगारा हॉटेल येथे घडली.

याबाबत संजय राजेंद्र परदेशी (वय २६, रा. मंगलगेट, जे जे गल्ली) याने तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. यामध्ये म्हंटले आहे की, आपण आपला मित्र अमित कैलास सुरसे त्याच्यासह चितळे रोडवरील पिंगारा हॉटेल येथे जेवण करायला गेले होते. जेवण करून झाल्यावर त्यांनी हॉटेलच्या वेटरला आवाज दिला व पाणी मागितले. तेव्हा त्यांच्या बाजूचे टेबलला जेवण करत असलेला अक्षय आडेप (रा.तोफखाना, अ.नगर ) हा त्याचे दोन मित्रासोबत जेवण करत होता. त्यावेळी तो बोलला की, एवढे मोठ्याने का आवाज देत आहे. तेव्हा संजय परदेशी त्यास म्हणाला की मी वेटरला आवाज दिला आहे तुमच्याशी आमचा काही संबंध नाही. असे मी बोलताच अक्षय हा शिवीगाळ करू लागला. म्हणून दोघानी त्यास समजावून सांगितले. तू विनाकारण शिवीगाळ करू नको आमचे जेवण झाले आहे. आम्ही येथून चाललो आहे. असे म्हणल्याचा त्याला राग आल्याने अक्षय याने त्याचे टेबलवर असणारी काचेची दारूची बाटली परदेशी यांच्या डोक्यात जोरात मारली. तेव्हा सुरसे याने परदेशी यास वाचवण्याचा प्रयत्न केला असता अक्षय व त्याचे दोन अनोळखी मित्राने दोघानाही लाथा बुक्क्यांनी बेदम मारहाण केली. त्यांच्यात चालू असलेले वाद तेथील हॉटेल मालकाने सोडवले. त्यानंतर अक्षय हा त्यांना बोलला की, तूम्ही पून्हा येथे यायचे नाही. आला तर तुम्हा दोघांना जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिली. या भांडणात परदेशी याच्या डोक्याला मार लागल्याने तो जखमी झाला.

याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात संजय परदेशी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अक्षय आडेप व त्याचे दोन साथीदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय शिक्षणसेवा पुरस्काराने मुख्याध्यापक हबीब शेख यांचा गौरव



नगर – शैक्षणिक क्षेत्रात विशेष योगदान देऊन भावी पिढी व्यसनमुक्त करण्यासाठी सातत्याने राबवित असलेल्या उपक्रमाबद्दल भोयरे पठार (ता. नगर) येथील भाग्योदय विद्यालयाचे मुख्याध्यापक हबीब चाँदभाई शेख यांना आदिलशाह फारुकी बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय शिक्षणसेवा पुरस्कार प्रदान करण्यात आला.


मुख्याध्यापक हबीब शेख यांचा राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय शिक्षणसेवा पुरस्काराने गौरव करताना दिलीप वाघ आदी.

जळगाव (अडावद, ता. चोपडा) येथील जिल्हाधिकारी कार्यालय, अल्पबचत भवन मध्ये झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात पाचोराचे माजी आमदार दिलीप वाघ यांच्या हस्ते शेख यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी फारुक शेख, हकीम चौधरी, समिना शेख, फारुक पटेल, संस्थेचे अध्यक्ष फारुख शाह नौमानी, उपाध्यक्ष डॉ. जावेद शेख, सचिव जुबेर शाह, कल्पना दबडे आदी उपस्थित होते.

हबीब शेख अनेक वर्षापासून शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत आहेत. शैक्षणिक कार्यातून भावी पिढी घडविण्याचे कार्य ते करत आहे. तसेच सामाजिक क्षेत्रात योगदान व गरजू घटकातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देऊन शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे काम ते सातत्याने करत आहे. विद्यालयाचा तालुक्यात स्तर उंचावण्यासाठी त्यांचे योगदान महत्त्वाचे ठरले आहे. तसेच भावी पिढी व्यसनमुक्त होण्यासाठी सातत्याने ते व्याख्यानाद्वारे प्रबोधन करत आहे. त्यांनी आपले भाग्योदय विद्यालय देखील तंबाखूमुक्त केले असून, विद्यार्थ्यांमध्ये व्यसनाच्या दुष्परिणामाची जागृती ते करत आहे. त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय शिक्षणसेवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

शेख यांना या पूर्वी देखील कास्ट्राईब शिक्षक संघटनेच्या वतीने शिक्षण मंत्री यांच्या हस्ते पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते व नुकतेच त्यांना जिल्हा मुख्याध्यापक संघाच्या वतीने शिक्षण संचालकांच्या हस्ते गुणवंत मुख्याध्यापक पुरस्कार देण्यात आला आहे.

शेख यांना सदरचा पुरस्कार मिळाल्याबद्दल भैरवनाथ शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष भानुदास कोतकर, संस्थेचे सचिव सचिन कोतकर, भाग्योदय विद्यालय केडगावचे प्राचार्य ज्ञानदेव बेरड, विद्यालयातील शिक्षकांनी त्यांचे अभिनंदन करुन पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.


सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचच्या वतीने आरोग्य तपासणी शिबिरामध्ये बोलताना मयूर गांगर्डे.

# आयुर्वेद हे मानवी आरोग्याला वरदान

## मयूर गांगर्डे यांचे प्रतिपादन; सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचातर्फे आरोग्य तपासणी शिबिर

नगर – आयुर्वेद हे मानवी आरोग्याला वरदान असून त्याचे विशेष असे महत्त्व आहे. सन एज कंपनी मार्फत तयार करण्यात आलेले उत्पादनांची माहिती देऊन हृदयविकार, संधिवात, मधुमेह, मणक्याचे आजार, पॅरालिसिस इत्यादी आजारांवर प्रभावी आयुर्वेद उत्पादने असल्याची माहिती मयूर गांगर्डे यांनी यावेळी सांगितली. कंपनी ऑरगॅनिक फार्मिंग वर काम करीत असून यामध्ये मानवी आरोग्य, शेतीचे आरोग्य व जनावरांचे आरोग्य यांचा समावेश असल्याचे त्यांनी नमूद केले.

सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचच्या वतीने आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी सन एज आयुर्वेद केअर कंपनीचे मयूर गांगर्डे (गोल्डन स्टार क्लब चिवर्स), सोमनाथ शेलार व त्यांचे सहकारी यांनी आधुनिक मशीनद्वारे ज्येष्ठ नागरिकांची आरोग्य तपासणी केली.

यावेळी मंचातर्फे सभासदांचे वाढदिवस साजरा करण्यात आला. मंचचे आदिनाथ जोशी, मोरेश्वर मुळे, बाजीराव जाधव, बलभीम पांडव, शोभा ढेपे, स्नेहल वेलणकर ज्योती केसकर श्रीकांत नाईक, अशोक काळे, सुधाकर भणगे, ओमकार फडतरे, यास्मीन पठाण, घोडके सर इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोरेश्वर मुळे यांनी केले तर आभार बाजीराव जाधव यांनी मानले. सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचातर्फे आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.



## महापालिकेची २४ तास सेवा अन् कचऱ्याचे ढिगारे

जुने कलेक्टर ऑफिस ते नगर कॉलेजरोड या रस्त्यावरच उघड्यावरच कचरा टाकल्यामुळे परिसरात दुर्गंधीचे साम्राज्य पसरले. (छाया – अमित मन्यार)

# श्री रेणुकामाता मल्टिस्टेट जामखेड शाखेच्या कर्ज मेळाव्यास प्रतिसाद

नगर – श्री रेणुकामाता मल्टिस्टेट जामखेड शाखेच्या कर्ज मेळाव्यास प्रतिसाद मिळाल्याची माहिती शाखेचे पालक अधिकारी दत्तात्रय अंकम यांनी दिली. प्रास्ताविक करताना जामखेड शाखेचे शाखाधिकारी शशिकांत जोगदंड यांनी विविध प्रकारचे कर्ज सुविधेविषयी माहिती दिली. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रशांत भालेराव यांनी महाराष्ट्रात वर्षभर कर्ज सुविधा सर्व शाखेत सुरू केली आहे. रु.३०,०००, रु.५०,०००, व रु.१,००,००० अशी वयक्तिक कर्ज सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

याशिवाय कॅश क्रेडिट लोन, होम लोन, व वाहन तारण कर्ज आदी विविध प्रकारचे कर्ज सुविधा आहेत. त्यामुळे ग्राहकांचा फायदा होणार आहे.

मेळाव्यात मुख्य कार्यालयाचे प्रतिनिधी एन.एन.करंडे तसेच मल्हारी सगळे, शरद घोलप, हरी जाधव, सय्यद चाँद, शालन फुलमाळी, प्रशांत काळे आदी उपस्थित होते. मेळावा यशस्वीतेसाठी रोहन घोडके, निकिता राऊत व अनिल साळवे यांनी परिश्रम घेतले.



श्री रेणुकामाता मल्टिस्टेट जामखेड शाखेच्या कर्ज मेळाव्यामध्ये एन.एन.करंडे, मल्हारी सगळे, शरद घोलप, हरी जाधव, सय्यद चाँद, शालन फुलमाळी, प्रशांत काळे आदी.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

